सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १४ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३३४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### मराठी भाषा भवन उभारणार

**मुंबई :** मराठी भाषा गौरव दिन निमित्ताने विधानपरिषदेत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती राज्याचे भाषा मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. याचाच भाग म्हणून मराठी भाषा भवन' उभारण्याचे काम सुरू झाले असून ते देशातील सर्वात आकर्षक भाषाभवनांपैकी एक असेल, असे त्यांनी सांगितले. विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात भाई जगताप यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर कोणती पाऊले उचलली गेली, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच मराठी भाषा विभागाने नेमके कोणते उपक्रम राबवले याबाबत प्रश्न उपस्थित केले.

### इंधन संकटाचा बागुलबुवा

**मुंबई :** इराण इस्त्राईल युद्धाचा फटका जगातील बहुतांश देशांना बसत आहे. मात्र अशा परिस्थितीतही भारत सुरक्षित असल्याचे पाहवत नसल्याने संजय राऊत,उबाठा गट, काँग्रेस हे गॅस व इंधन संकटाचा बागुलबुवा उभा करून त्याच्या नावाखाली सामान्य जनतेमध्ये घबराट निर्माण करण्याचे घाणेरडे राजकारण खेळत असल्याचा प्रहार भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. देशात ५० लाख गॅस सिलेंडर रोज पुरवले जात आहेत, होर्मुझ सामुद्रधुनीतून कच्च्या तेलाची आयात सुरळीत करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केंद्र सरकारकडून केले जात आहेत. इंधन आयातीसाठी पर्यायी मार्गांचा अवलंब, इतर देशांकडून कच्च्या तेलाची आयात वाढ करणे यासारख्या उपाययोजना करून केंद्र सरकार युद्धपातळीवर कामाला लागले असताना राऊत आणि काँग्रेस गॅस टंचाईच्या नावाखाली जनतेच्या मनात भीती निर्माण करत असल्याचेही ते म्हणाले.

### खाद्यानांचा तुटवडा ?

**मुंबई :** एलपीजीच्या सध्याच्या कमतरतेचा परिणाम रेल्वे स्थानकांमधील रेस्टॉरंट्सवर होऊ लागला आहे, अनेक खाद्यपदार्थ विक्रेत्यांना गॅस पुरवठ्यात घट झाल्यामुळे नियमित कामकाज सुरू ठेवण्यात अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. पश्रि्चम आशियातील तणावामुळे व्यावसायिक एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून, यामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सारख्या मोठ्या स्थानकांवरील खाद्यान्न स्टॉल्सवर वडापाव आणि समोसे मिळणे कठीण झाले आहे. आयआरसीटीसीच्या शिवडी येथील क्लाउड किचनमधून दररोज मध्य आणि पश्रि्चम रेल्वेच्या ४,५०० प्रवाशांसाठी जेवण तयार केले जाते. मात्र, गॅसअभावी ताज्या अन्नाच्या उत्पादनावर मर्यादा आल्या आहेत.

### शेअर बाजार घसरला

**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धाचे प्रतिकूल पडसाद शुक्रवारी जगभरातील शेअर बाजारांवर मोठ्या प्रमाणात दिसले. डाऊ जोन्स ८०० अंकांनी आपटला आणि गुरुवारी बंद झाला. याचा परिणाम जगभरातील शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबईत बीएसई सेन्सेक्समध्ये शुक्रवारी सकाळी मोठी घसरण झाली. सकाळी साडेनऊ वाजता सेन्सेक्स ४९२.३१ अंकांनी घसरून ७५,५४२.११ वर पोहोचला. याआधी गुरुवारी सेन्सेक्स ७६,०३४.४२ वर बंद झाला होता. निफ्टी फिफ्टी १७१.६५ अंकांनी घसरून २३,४७३.२५ वर पोहोचला. याआधी गुरुवारी निफ्टी फिफ्टी २३,६३९.१५ वर बंद झाला होता.

### खामेनी कोमामध्ये ?

**तेहरान :** इराणचे नव्याने नियुक्त सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांच्याबाबत सतत नवनवीन बातम्या समोर येत आहेत. अशातच काही वृत्तांनी दिलेल्या माहितीनुसार मोजतबा खामेनी तेहरानच्या हल्ल्यानंतर कोमामध्ये आहेत. मात्र इराणकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. तर दुसरीकडे डोनाल्ड ट्रम्प यांनी खामेनी गंभीर जखमी असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे जगभरात चर्चेला उधाण आले आहे.तर काही सूत्रांच्या माहितीनुसार, एका हवाई हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यानंतर खामेनी यांचा एक पाय कापावा लागला आहे.

### इराणकडून हिट लिस्ट जारी ?

**तेहरान :** मध्यपूर्वेत सुरू असलेला अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आता अधिक धोकादायक टप्प्यावर पोहोचत असल्याचे संकेत मिळत आहेत. इराणने अलीकडेच एक नवी 'हिट लिस्ट' जाहीर केली असून त्यात अमेरिकेच्या प्रमुख तंत्रज्ञान कंपन्यांच्या कार्यालयांना लक्ष्य केले जाऊ शकते, असे म्हटले आहे. या यादीत गुगल, अमेझॉन, मायक्रोसॉफ्ट, एनव्हिडिया, आयबीएम, ओरॅकल आणि पॅलांटीर यांसारख्या मोठ्या टेक कंपन्यांचा

# महाराष्ट्रात गॅस, पेट्रोल-डिझेलचा तुटवडा नाही

## इराण-इस्त्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विशेष समित्यांची स्थापना; रिफायनरींकडून उत्पादन वाढवले

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ मार्च :** इराण आणि इस्त्राईलमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर अनिश्रि्चतता निर्माण झाली असली, तरी महाराष्ट्रात घरगुती एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. संभाव्य टंचाई रोखण्यासाठी आणि पुरवठा साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य सरकारने जिल्हास्तरावर विशेष समित्या आणि नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी ही माहिती दिली.



राज्यात दररोज सरासरी ९ हजार मेट्रिक टन एलपीजीची मागणी असते. ही गरज ओळखून रिफायनरींमधील उत्पादन गेल्या दोन दिवसांत ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्यात आले आहे. त्यामुळे घरगुती गॅसचा तुटवडा भासणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पुरवठा साखळीत अडथळे येऊ नयेत यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सरकारी गॅस कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. या समित्या दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करतील. गॅस एजन्सी आणि वाहतूक करणाऱ्या वाहनांना आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**अत्यावश्यक सेवांना प्राधान्य**

आगामी सण-उत्सव आणि सार्वजनिक संस्थांची गरज लक्षात घेऊन रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शाळा-महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना आणि आश्रमशाळांना प्राधान्याने गॅस पुरवठा केला जाणार आहे. हॉटेल आणि रेस्टॉरंटना पर्यायी इंधनाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे निर्देशही जिल्हा समित्यांना देण्यात आले आहेत. मात्र, असे करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.

**पेट्रोल आणि डिझेलचा मुबलक साठा**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचाही मुबलक साठा आहे. दररोजची १५ हजार किलो लिटर पेट्रोल आणि ३८ हजार किलो लिटर डिझेलची मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. तसेच पाइप्ड नॅचरल गॅसचा (पीएनजी) पुरवठाही सुरळीत राहणार असल्याची खात्री प्रशासनाने दिली आहे.

# राज्यातील चेक पोस्ट बंद करणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ मार्च :** चेक पोस्ट संदर्भात लोकप्रतिनिधी तसेच विविध संस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या विषयाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याबाबत शासन सकारात्मक असून यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरू असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

या संदर्भात सदस्य नाना पटोले यांनी लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, केंद्र शासनाकडूनही चेक पोस्ट रद्द करण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याची भूमिका शासनाने निश्रि्चत केली आहे. मात्र, चेक पोस्ट संदर्भात पूर्वी करण्यात आलेल्या कराराची मुदत अद्याप शिल्लक असल्याने त्याबाबत कायदेशीर आणि आर्थिक बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. संबंधित कंपनीशी या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला असून करारातील अटींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच चेक पोस्टवर अनियमितता होत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. काही ठिकाणी करारातील अटींचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीत ठेकेदार किंवा संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. याबाबत कायदे तज्ज्ञांचे अभिप्रायही घेण्यात आले असून विद्यमान करारातील तरतुदीनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल. शासनामार्फत राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याबाबत व त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

## अमित देशमुखांनी उपस्थित केला मराठी भाषा सक्तीचा मुद्दा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ मार्च :** काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात मराठी भाषा सक्तीचा मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या आणि सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची आहे असे सांगितले जाते. पण वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. महाराष्ट्रात उइडए, खउडए आणि खइ बोर्डाच्या तसेच, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराती, कानडी व इतर प्रांतातील भाषेच्या माध्यमांच्या अशा अनेक शाळा आहेत. तिथे मराठी भाषा शिकवली जात नाही, ही वस्तुस्थिती शासनाने मान्य करावी. किमान आगामी वर्षापासून तरी महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा अनिवार्य असल्याचा जो कायदा आहे त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे ते म्हणाले. अमित देशमुख यांनी मागच्या आठवड्यात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून सभागृहात सदरील मागणी केली होती. आज पुन्हा एकदा ती मागणी करत असल्याचे सांगून सरकार हा विषय गांभीर्याने घेईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

## अनाथ विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अडचणी दूर करू - मंत्री चंद्रकांत पाटील

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ मार्च :** राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत दिली. सदस्य योगेश सागर यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य अतुल भातखळकर यांनीही सहभाग घेतला.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्य शासनाने अनाथ विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर आरक्षण लागू केले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. या आरक्षणामुळे अनेक अनाथ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि शासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध होत आहे. महाविद्यालयांमध्ये ५० टक्के शुल्क माफी किंवा मुलींसाठी १०० टक्के फी माफी लागू असतानाही प्रवेशावेळी शुल्क भरण्याची सक्ती केल्याच्या तक्रारी आल्यास संबंधित शिक्षण संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल. यासाठी प्रत्येक महाविद्यालयात शिष्यवृत्ती प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.

सीईटी प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेली कागदपत्रे शिष्यवृत्ती अर्जासाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना पुन्हा कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही. तसेच सध्या शिष्यवृत्ती पोर्टलवर 'अनाथ' असा स्वतंत्र पर्याय नसल्याने येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलमध्ये तो समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले.

# ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत आता थेट अटक नाही

## FIR नंतर चौकशीत गुन्हा सिद्ध झाला तरच अटक -मंत्री संजय शिरसाट

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ मार्च :** राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आजही दोन्ही सभागृहांत विविध मुद्यांवर चर्चा झाली. आज सभागृहात विविध शासकीय व अशासकीय कामकाज झाले. यात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत आत थेट अटक होत नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणी एफआयआर दाखल झाल्यानंतर प्रथम समिती चौकशी होते आणि त्यात गुन्हा सिद्ध झाला तरच संबंधिताला अटक होते अन्यथा गुन्हा रद्द होतो, असे ते म्हणालेत.



**ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत आता चौकशीनंतरच गुन्हा - मंत्री शिरसाट**

पूर्वी 'ॲट्रोसिटी'चा गैरवापर केला जात असे. म्हणून आपण या कायद्यात बदल केले. आता 'ॲट्रोसिटी'अंतर्गत 'एफआयआर' दाखल झाल्यावरही समितीतर्फे चौकशी होते, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक करण्यात येते अन्यथा 'एफआयआर' रद्द होतो. कुणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, हा यामागील उद्देश आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज विधान परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली.

# इराण विरूद्धच्या युद्धात अमेरिकेने दोन आठवड्यात गमावली चार विमान

**वॉशिंग्टन डीसी :** इराण विरूद्धच्या युद्धात अमेरिकेने दोन आठवड्यात चार विमानं गमावली आहेत. यूएस आर्मीचे हवेतल्या हवेत इंधन भरण्याचे केसी १३५ स्ट्रॅटोटँकर हे विमान इराकमध्ये गुरुवारी कोसळले. यूएस सेंट्रल कमांडने विमान कोसळल्याचे सांगितले. हे विमान इराकच्या पश्रि्चमेकडील भागात कोसळले. अमेरिकेने विमान कोसळण्याचे कारण जाहीर केलेले नाही. पण इराकमधील इराण समर्थक असलेल्या एका सशस्त्र गटाने विमान पाडल्याचा दावा केला आहे.

**काय आहे केसी १३५ स्ट्रॅटोटँकर ?**

केसी १३५ स्ट्रॅटोटँकर हे १९५० - ६० च्या दशकाच्या सुरुवातीला बोईंगने बनवले होते. ते अमेरिकन सैन्याच्या हवेतल्या हवेत इंधन भरण्याच्या ताफ्यासाठी एक आधारस्तंभ राहिले आहे आणि विमानांना उतरण्याची आवश्यकता न पडता मोहिमा पार पाडण्यास मदत करण्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार अमेरिकेच्या हवाई दलाकडे ३७६ केसी-१३५ विमाने होती, ज्यात १५१ सक्रिय, १६३ एअर नॅशनल गार्डमध्ये आणि ६२ एअर फोर्स रिझर्व्हमध्ये होती. अमेरिकेच्या नौदलाच्या वेबसाईटनुसार एका केसी १३५ स्ट्रॅटोटँकरची किंमत १९९८ मध्ये ३९.६ दशलक्ष डॉलर होती. सध्याच्या महागाईच्या निर्देशांकाचा विचार करता हे विमान ७९.६ दशलक्ष डॉलर होते. एका केसी १३५ स्ट्रॅटोटँकरमधून ८३ हजार पौंड मालाचे वहन करणे शक्य आहे. हे विमान हवेतल्या हवेत इंधन भरण्यासाठी तसेच युद्धभूमीवर उडते रुग्णालय आणि उडती रुग्णवाहिका अशा दोन्ही स्वरुपात वापरण्याची सोय आहे.



File photo of a US Air Force Boeing KC-135 Stratotanker aerial refuelling tanker

पश्रि्चम इराकमध्ये विमान कोसळण्याआधी केसी १३५ स्ट्रॅटोटँकर हे २०१३ मध्ये किर्गिस्तानमधील मानस विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर लगेचच कोसळले होते. ताज्या घटनेत इराकमधील इराण समर्थक असलेल्या एका सशस्त्र गटाने विमान पाडल्याचा दावा केला आहे.

# आम्ही युद्ध थांबवू पण...; युद्ध थांबवण्यासाठी इराणने ठेवल्या तीन अटी

**तेहरान/वृत्तसंस्था :** मध्य पूर्वेत इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा आज १४ वा दिवस आहे. ही लढाई प्रत्येक दिवसागणिक अधिक तीव्र होत चालली आहे. आजही दोन्ही बाजूंनी जोरदार क्षेपणास्त्र, बॉम्ब आणि तोफगोळ्यांचा मारा सुरू आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील युद्ध लवकरच संपण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी म्हटले आहे की इराणमध्ये आता काहीही उरलेले नाही आणि अमेरिकेने आपली सर्व लष्करी उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. दुसरीकडे, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्किक्यन यांनी युद्ध समाप्त करण्यासाठी तीन महत्त्वाच्या अटी मांडल्या आहेत.



इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्किक्यन यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील त्यांच्या अधिकृत हँडलवर पोस्ट करत म्हटले रशिया आणि पाकिस्तानच्या नेत्यांशी संवाद साधताना मी प्रदेशात शांततेसाठी इराणची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेकडून सुरू करण्यात आलेले हे युद्ध संपवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे इराणच्या वैध अधिकारांना मान्यता देणे, नुकसानभरपाईचा भरणा करणे आणि भविष्यातील आक्रमणांविरोधात ठोस आंतरराष्ट्रीय हमी देणे.

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एक मोठा दावा केला आहे. ट्रम्प यांनी म्हटले की इराणमधील लष्करी तळ आणि लक्ष्यांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले करण्यात आले असून त्यामुळे आता इराणमध्ये काहीही शिल्लक राहिलेले नाही. त्यांच्या वायुसेनेपासून ते हवाई संरक्षण व्यवस्थेपर्यंत सर्व काही निष्प्रभ करण्यात आले आहे आणि अमेरिका जेव्हा इच्छितील तेव्हा हे युद्ध संपवू शकते. मात्र, युद्ध समाप्त करण्यासाठी अमेरिका नेमकी कोणती रणनीती अवलंबणार आहे, याबाबत त्यांनी स्पष्ट माहिती दिली नाही. तसेच त्यांनी असा आरोप केला की इराणने गेल्या ४७ वर्षांत जगाला मोठे नुकसान पोहोचवले असून आता त्याची किंमत चुकवावी लागत आहे.



दरम्यान, इस्त्रायलचे हिजबुल्लाहच्या ठिकाणांवरील हल्ले सुरूच आहेत. इस्त्रायलने लेबनानची राजधानी बेरूत येथे जोरदार हवाई हल्ले केले आहेत. इस्त्रायली संरक्षण दलाच्या (आयडीएफ) हवाई कारवाईत बेरूतच्या दक्षिणेकडील बुर्ज अल-बराजनेह परिसराचे मोठे नुकसान झाले आहे. या हल्ल्यानंतर बेरूतमधील निवासी भागांत जोरदार स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि अनेक घरांना आग लागली.लेबनानच्या आरोग्य मंत्रालयानुसार, २ मार्चपासून सुरू असलेल्या इस्त्रायली हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ८६ मुलांसह आणि ४७ महिलांसह ६०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून १,४४४ जण जखमी झाले आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्याल बाबळगावच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, दूरदर्शी नेते आणि विचारवंत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आणि त्यांच्या सर्वसमावेशक विचारांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासात त्यांच्या योगदानाचे विशेष स्मरण करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा. ज्ञानदेव कांबळे आपल्या भाषणात सांगितले की,यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते तर दूरदृष्टीचे राष्ट्रपुरुष होते. शिक्षण, सहकार आणि सर्वसमावेशक विकासाचा त्यांनी दिलेला आदर्श आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजभान जपले पाहिजे. तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे,यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प अध्यापक आणि विद्यार्थी यांनी करावा. असे आवाहन केले.



# पोलीस दलाकडून 'आपले लातूर - सुरक्षित लातूर 'उपक्रम

## जीपीएस आधारित क्यूआर कोड स्कॅनर यंत्रणा कार्यान्वित : पोलीस अधीक्षक अमोल तांबे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि. १३ मार्च :** लातूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी तसेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध आधुनिक आणि तांत्रिक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आपले लातूर - सुरक्षित लातूर या उपक्रमांतर्गत शहरामध्ये जीपीएस आधारित क्यूआर कोड स्कॅनर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे,अशी माहिती पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.



लातूर शहरातील नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस गस्त अधिक परिणामकारक करण्याचा हेतू या यंत्रणेच्या माध्यमातून साध्य होणार आहे. शहरातील गुन्हेगारीला आळा घालणे, संवेदनशील ठिकाणी पोलीसांची उपस्थिती वाढवणे तसेच पोलीस गस्त व्यवस्थेचे अधिक प्रभावी नियोजन करणे या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत लातूर शहरातील सुमारे ३१८ संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी जीपीएस आधारित क्यूआर कोड बसविण्यात आले आहेत. संबंधित ठिकाणी चार्ली पेट्रोलिंग पथक, दामिनी पथक तसेच वाहतूक शाखेचे पोलीस नियमित भेट देणार असून तेथे बसविण्यात आलेले क्यूआर कोड ई-पोलीस ॲपच्या माध्यमातून स्कॅन करणार आहेत. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित असल्याचा सेल्फी फोटो ॲपमध्ये अपलोड करणार आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना संबंधित ठिकाणी पोलीसांनी दिलेल्या भेटीची अचूक वेळ, लोकेशन व फोटोसह माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलीसांची गस्त नियमितपणे होत आहे की नाही, यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार असून पोलीस गस्त अधिक शिस्तबद्ध व परिणामकारक होण्यास मोठी मदत होणार आहे. या नव्या प्रणालीअंतर्गत प्रत्येक १२ तासांच्या कालावधीत शहरातील किमान ३१८ संवेदनशील ठिकाणांना पोलीसांकडून भेट दिली जाणार असून त्यामुळे शहरात सतत पोलीस उपस्थिती राहून गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होणार असून शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला मोठे बळ मिळणार आहे.

शहरात बसविण्यात आलेले क्यूआर कोड असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींनी फाडणे, खराब करणे किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण केल्यास त्याबाबत आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच नागरिकांकडून मिळणाऱ्या सूचनांच्या आधारे आवश्यक त्या ठिकाणी भविष्यात आणखी क्यूआर कोड स्कॅनर बसविण्याचाही विचार करण्यात येणार आहे.

सदर उपक्रमाची अंमलबजावणी अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर व श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. या कामकाजात समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) तसेच पोलीस अंमलदार पांडुरंग सगरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

## महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांचा सिंहाचा वाटा : डॉ. कुंभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** नव महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूर व यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठान लातूरच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी यशवंतवांच्या जीवनावर प्रकाश टाकताना त्यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीतील भूमिका सोदाहरण विषद केली. यावेळी लोक्कास प्रतिष्ठानचे सचिव प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे लातूर विभागीय सदस्य विद्याधर कांदे-पाटील, सौ. सुनिता आरळीकर, विक्रम कदम, ॲड. वसंतराव उगिले, ॲड. सुधाकर आरसुडे. ॲड. शेखर विले, पंकज जैस्वाल, पृथ्वीराज गोरे, जितेंद्र तोडकर, प्रवीण सांळुके व मनपाच्या महिला कर्मचारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार विक्रम कदम यांनी मानले.

## विद्यार्थी शालेय शिक्षणाबरोबरच कला कौशल्यात निपुण व्हावीत- शिक्षण विस्तार अधिकारी निवृत्ती जाधव



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच विविध अंगी कला- कौशल्य आत्मसात करून त्यात निपूण व्हावे ,असे प्रतिपादन बाभळगाव बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी निवृत्ती जाधव यांनी केले.

लातूर तालुक्यातील मळवटी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मळवटी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सकपाळ नगर यांचे वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते .

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या राजश्री देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गोविंद गरड हे होते.

तर विचार मंचावर कासारखेडा केंद्राचे केंद्रप्रमुख हिरालाल पाटील, केंद्रीय मुख्याध्यापक बिभिषन जाधव, शिक्षक नेते शिवाजीराव साखरे, गौतम टाकळीकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालाजी भंडे, अध्यक्षा राणी एडके, माया सूर्यवंशी, जनार्दन गायकवाड, गणेश जाधव, विलास टेकाळे, बालाजी सुरवसे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना जाधव म्हणाले की, माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावर जग झपाट्याने बदलत असून, ज्ञानाच्या कक्षाही व्यापक होत आहेत याचा कुशलतेने व सकारात्मक पद्धतीने वापर करून, विद्यार्थ्यांनी आपली प्रगती साधावी, असेही ते शेवटी म्हणाले. शालेय विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण पद्धतीने नृत्य व नाटिका यांचा कलाविष्कार सादर करून दाद मिळवली तर अंगणवाडीतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मन जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीचंद बर्डे व कांचन कलवले यांनी तर प्रास्ताविक शिवलिंग पवार यांनी केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर शिंदे, श्रीकांत कराड, भारत रणदिवे, फातेमा पठाण, शितल सोनवणे, गणपती केंद्रे, मुरलीधर चव्हाण, उमाकांत कांबळे, शुभम भोसले, सुरज माळी, रेखा कांबळे, प्रवीण कसबे, पवन ठाकूर, महादेवी जाधव, राजपाल जाधव, दगडू गरड, लक्ष्मण सावळे आदींनी सहकार्य केले.

## दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

### उदात्त ध्येय ठेवून यश संपादन करा : अर्चना मैंदर्गी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे होते. मंचावर पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, विभागप्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी, प्रा. सूरज साबळे व प्रा. हरी कुंभार उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व नायब तहसीलदार अर्चना मैंदर्गी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी उदात्त ध्येय ठेवून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. आवडीचे क्षेत्र निवडून त्यात सातत्याने प्रयत्न करावेत, संतुलित आहार घ्यावा तसेच स्क्रीन टाईम मर्यादित ठेवावा, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. दिलीप नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरणात करिअर निवडताना स्वतःच्या मनाचा विचार करण्याचा सल्ला दिला. यावेळी डॉ. संदीपान जगदाळे यांनी संगीत विभागात वर्षभर राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली, तर विभागप्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव सुळ यानी केले. प्रास्ताविक त्रिगुणी बावस्कर हिने केले, तर पाहुण्यांचा परिचय समीक्षा साखरे हिने करून दिला. आभारप्रदर्शन साक्षी गंडले हिने केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सूरदास शिनगारे व प्रसाद सारगे यांनी शारदा स्तवन सादर केले.

यावेळी राष्ट्रीय कला उत्सवात भारतात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल कुमारी सायली टाक हिचा तसेच इतर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोहम गायकवाड, रितेश गायकवाड, ओंकार पौळ, ओंकार तेलघाने, कु. राणी गडेराव, कु. गौरी भूमकर, कु. रेवती घाडगे, कु. गायत्री पवार, कु. पल्लवी वाघमारे, कु. राजेश्र्वरी खारवणे व कु. हबीबा शेख यांनी परिश्रम घेतले.

# लातूर जिल्ह्यात बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा प्रकल्पाची होतेय प्रभावी अंमलबजावणी; ६ लाखांहून अधिक रोपांची लागवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** राज्यातील शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि शाश्र्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच त्यांना हवामान बदलाच्या संकटातून सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांबू आधारित कृषी-वनीकरणावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र बांबू उद्योग धोरणही जाहीर केले आहे. हवामान बदलामुळे शेतीमध्ये निर्माण होणारी अनिश्र्चितता दूर करण्यासाठी बांबू हे एक प्रभावी पीक ठरत आहे. बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी लातूर जिल्ह्यात 'बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा' प्रकल्प राबविला जात आहे. लातूर जिल्ह्यात लोदगा येथील फिनिक्स फाउंडेशन आणि गोदरेज ग्रोव्हेट यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३ पासून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.



या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना केवळ बांबू लागवडीचे प्रशिक्षणच दिले जात नाही, तर त्यांच्या कौशल्य विकासावरही भर दिला जात आहे. लातूर जिल्ह्यात राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे प्रमुख पाशा पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला जात आहे. जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमध्ये २०२३ ते २०२५ या कालावधीत सुमारे ६ लाख ११ हजार ७२९ बांबू रोपांची लागवड पूर्ण झाली आहे. आतापर्यंत एकूण २ हजार ८५२ शेतकऱ्यांनी या मोहिमेत नोंदणी केली असून, त्यापैकी १ हजार ९५३ शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानासाठी अर्ज सादर केले आहेत. या प्रकल्पासाठी शासनाकडून सुमारे ९० कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

### पर्यावरणपूरक आणि किफायतशीर शेती

बांबू हे कमी पाण्यावर येणारे पीक असून, उसाच्या तुलनेत याला अत्यंत कमी पाणी आणि रासायनिक खतांची गरज भासते. बांबूची झाडे इतर वृक्षांच्या तुलनेत ३० ते ३५ टक्के अधिक ऑक्सिजन उत्सर्जित करतात आणि मोठ्या प्रमाणात कार्बन शोषून घेतात. औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये कोळशाला पर्याय म्हणून बांबूचा वापर होत असल्याने देशाच्या स्वच्छ ऊर्जा मोहिमेला (ग्रीन एनर्जी) यामुळे चालना मिळत आहे.

### प्रशिक्षण आणि अंमलबजावणीवर भर

औसा तालुक्यातील लोदगा येथे बांबू रोपवाटिका आणि अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत गाव आणि तालुक पातळीवर समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत. हे समन्वयक प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांना जमिनीची निवड, खड्डा खोदणे, ठिबक सिंचन आणि खत व्यवस्थापनाचे तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत. यात प्रामुख्याने 'तुल्डा 'मानवेल' यांसारख्या प्रगत जातींच्या ऊतक संवर्धन (टिश्यू कल्चर) तंत्रावर भर दिला जात आहे.

### शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी जनजागृती

शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी 'मोबिलायझेशन व्हॅन', ध्वनिक्षेपक आणि लघुपटांच्या माध्यमातून गावोगावी बांबू शेतीचे महत्त्व पटवून दिले जात आहे. विशेष ग्रामसभा, प्रात्यक्षिक प्लॉट (डेमो प्लॉटस) आणि महिला बचत गटांना बांबूपासून शोभेच्या वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम सुरू आहे. बांबूपासून इंधन विटा, फर्निचर, हस्तकला, कागद आणि कापड यांसह १८०० पेक्षा अधिक वस्तूंची निर्मिती शक्य असल्याने, हा प्रकल्प लातूरच्या ग्रामीण भागासाठी विकासाची नवी दिशा ठरत आहे.

## विविध वृत्त...

### सार्वजनीक गुढी महोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी विकास कांबळे तर स्वागताध्यक्षपदी अमोल गिते

**लातूर :** लातूरच्या गंजगोलाईतील 'प्रथम मानाच्या सार्वजनीक गुढी महोत्सव' समिती २०२६ च्या अध्यक्षपदी लातूरचे नगरसेवक तथा मनपा स्थाई समिती सदस्य विकास सतिशराव कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच स्वागताध्यक्षपदी अमोल गिते यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी बालाजी गवळी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर केली आहे.







उर्वरीत कार्यकारीणी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष -संजय सोनकांबळे, कोषाध्यक्ष - रामेश्वर भराडीया, सचिव - नितिन पडिले, कार्यक्रम प्रमूख - रामभाऊ जवळगे, सहकोषाध्यक्ष - नारायण भूतडा, सदस्य - काकासाहेब घुटे, धनंजय पाटील, बालाजी नागरगोजे, रवि जाधव, सचिन गांगले आदी. या नूतन कार्यकारीणीचा सत्कार गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांच्या हस्ते करणात आला. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे हे ३८ वे वर्ष आहे. यंदा गुढी पाडवा सण गुरुवार १९ मार्च रोजी साजरा करण्यात येणार असून त्यानिमित विविध सामितीचे गठण आणि सार्वजनीक उपक्रमांची माहिती देण्यात येईल असे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी यावेळी सांगीतले. नूतन कार्यकारीणीचे स्वागत विविध स्तरातून होत आहे.

### ग्राहक जनजागृती सेवा संस्थेच्या लातूर शहर अध्यक्षपदी वर्षा पाटील

**लातूर :** ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य लातूर शहर महिला जिल्ह्यध्यक्ष पदी वर्षा पाटील यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे व सचिव दिपाली औटे यांच्या हस्ते देण्यात आले



वर्षा दगडु पाटील यांची ही निवड आजपर्यंत त्यांचे सामाजिक कार्य व त्यांचा लातूर शहरभर असलेला दांडगा जनसंपर्क व ग्राहक जनजागृतीपर अभियान सक्षमपणे व ग्राहक जनजागृतीपर काम करत असल्याने केली गेली आहे. ग्राहकांना न्याय देण्यासाठी या माध्यमातून लातूर शहरभर संघटन करुन व ग्राहक कसा जागरुक झाला पाहिजे व त्याची लुट केल्यास त्यास न्याय मिळवून देण्याचे काम आपणच करु शकतात, या हेतूने वर्षा पाटील यांची निवड केल्याचे अभिजीत औटे यांनी सांगितले, सदरील निवडीबद्दल ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा दिपाली कवडे, कोषाध्यक्ष रतिकांत घोगरे, मराठवाडा अध्यक्ष युनूस चौधरी, छत्रपती संभाजीनगर महिला जिल्हाध्यक्षा शिल्पा चुडीवाल, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम, सय्यद सलीम यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

### शासकीय योजनांच्या लाभासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करावी

**लातूर:** महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण विभागातंर्गत दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. यात दिव्यांगाची हेळसांड होवू नये व घरबसल्यास योजनेचा लाभ घेणे सोईचे होईल, यादृष्टीकोनातून मुंबई दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्यावतीने दिव्यांग सहाय्यक पोर्टल निर्मिती करण्यात आली आहे. या पोर्टलवर जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करुन शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना यांनी केले आहे.केंद्र व राज्य शासनामार्फत दिव्यांग बांधवांना सक्षम बनविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ दिव्यांगांना सुलभ होण्याच्या दृष्टीने या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात असून विविध विभागातील माहिती यात दर्शविण्यात आली आहे. एकाच छताखाली दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, यात शासकीय योजनासह सेवा व लाभ यातून मिळणार आहेत. दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती, साधने व उपकरणे, स्वंयरोजगारासाठी साधन सामुग्री, अर्थसहाय्य, गुणवत्ता पुरस्कार, सामाजिक सुरक्षा अंतर्गत विवाह प्रोत्साहन अनुदान, विविध शाळा व महाविद्यालयातील प्रवेश, रुग्णालयातील उपचार यासह अनेक योजनांचा या पोर्टलवर समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांनी https://divyangsahayakportal.maharashtra.gov.in या संकेस्थळावर ऑनलाईन नोंदणी करतांना युआयडी क्रमांक टाकून नोंदणी करावी व विविध योजनांचा लाभ घ्यावा असे कळविले आहे.

### शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत

स्वप्नील संजय कदम या नावाची college of computer science and information technology Cocsit college Latur ची टीसी, बीएससी सीएस तसेच १०वी १२ वि ची मार्कसीट उमरगा ते लातूर प्रवासात हरविली आहे. सापडल्यास खालील संपर्क करणे.

मो.८७६७७५०५५२

धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बाभळगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ मार्च -**
येथील पौर्णिमा महिला बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने बाभळगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा बाबई चव्हाण होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या रेणुका लिंबोळे, नागेश चव्हाण व तुळसाबाई बनसोडे उपस्थित



होते. यावेळी बोलताना बाबई चव्हाण म्हणाल्या की, आज संपूर्ण जगात महिलांना आदराचे स्थान प्राप्त झाले असून स्त्री सक्षम झाली आहे. महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देत त्यांचा लाभ घेऊन महिलांनी अधिक सक्षम व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तुळसाबाई बनसोडे, अंबिका पवार, आप्पाराव बनसोडे, नरसिंग जगताप, समाधान बनसोडे, केराबाई लोंढे, प्रतिमा थोरात, भारतबाई चौगुले, सीताराम पवार, सुजाता गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर उपस्थित महिलांना संस्थेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आल्या.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



#### नागूर जि.प. शाळेत बक्षीसांचे वितरण

**लोहारा, दि.१३ मार्च -**
लोहारा तालुक्यातील नागूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन, विज्ञान दिन, स्वयंशासन दिन तसेच मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महादेव इंगळे व उपाध्यक्ष अमजद तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संतोष चंदनशिवे, पवन चंदनशिवे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक के.डी. भोसले, बोधनापोड, चंदनशिव, सूर्यवंशी, लोंढे, श्रीचामे, भंडारे व एस.एम. काळे आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एम. भंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सूर्यवंशी एस. यांनी मानले.




#### न.प. शाळेत यशवंतराव चव्हाण जयंती साजरी

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**
नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.३ तुळजापूर खुर्द येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी नगरसेविका मंजुषा देशमाने, दिनेश क्षीरसागर, किरण सुरवसे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षण विभागप्रमुख अशोक शेंडगे, मुख्याध्यापक तुकाराम मोटे, निर्मला कुलकर्णी, सतीश यादव, जालिंदर राऊत, शरद कोळगे, दत्ता मेढे, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, अतुल काकडे, अनिल राठोड, रंजीत नाईकवाडे, कल्पना व्हटकर, शेख इ. उपस्थित होते.



#### चित्रकार दिग्विजय कुंभार यांचा गौरव

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**
उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी, काळा घोडा, मुंबई येथे पार पडले. या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या राज्यस्तरीय प्रदर्शनात तुळजापूर येथील चित्रकार दिग्विजय कुंभार यांनी रेखा व रंगकला या विभागात सहभाग नोंदवून आपल्या कलाकृतींचे सादरीकरण केले. त्यांच्या या सहभागाबद्दल कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



#### उज्वला पाटील यांचा सत्कार

**वाशी, दि.१३ मार्च -**
बोरी (ता.वाशी) येथील जि.प. शाळेला तसेच गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल बोरी ग्रा.पं. सदस्या उज्वला पाटील यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. पाटील यांनी शाळेसाठी २ कपाट, २ टेबल, १० खुर्च्या, २० बेंच तसेच २५ ताट व २५ ग्लास असा साहित्य पुरवठा केला. याशिवाय विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसेही देण्यात आली. भाजपचे नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अंभुरे, पटेल व चव्हाण यांनी पाटील यांचा शाळेत सत्कार केला. यावेळी गावातील पालक व महिला उपस्थित होते.



#### वैष्णवीची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**
तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी कोल्हे हिच्या विज्ञान प्रयोगाची इन्स्पायर अवॉर्ड मानांकन २०२५-२६ साठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची या प्रतिष्ठित मानांकनासाठी निवड झाल्याने परिसरात तिचे कौतुक होत आहे. वैष्णवी कोल्हे हिने विद्यालयातील अटल टिंकरिंग लॅबच्या समन्वयक अनुष्का मसलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा विज्ञान प्रयोग सादर केला.

## हिंदूंनी संघटित राहण्याची गरज : निलेश गद्रे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**
हिंदूंनी जातीभेद बाजूला ठेवून संघटित राहण्याची गरज असून इतिहासात एकत्रित शक्तीचा अभाव असल्याने हिंदू समाजाला दीर्घकाळ गुलामगिरीचा सामना करावा लागल्याचे नमूद करत सामाजिक ऐक्य ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सामाजिक समरसता मंचाचे क्षेत्र समन्वयक निलेश गद्रे यांनी केले.




धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) येथे आयोजित विराट हिंदू संमेलनात ते बोलत होते. यावेळी वारकरी परंपरेतील प्रवचनकार हभप. ज्ञानेश्वर माऊली महाराज एकंबीकर यांनी वारकरी संप्रदायाने समाजात एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. विविध संतांनी धर्म व समाजरक्षणासाठी दिलेल्या त्यागाची उदाहरणे देत हिंदूंनी परस्परांतील भेद विसरून एकत्र राहावे, असे आवाहन केले.

संमेलनाच्या निमित्ताने सकाळपासून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महादेवाला गावातील विविध समाजघटकांतील २१ जोडप्यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर काढण्यात आलेल्या ग्रामदिंडीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याच पार्श्वभूमीवर हर घर भगवा अभियान राबवून गावातील अनेक घरांवर भगवा ध्वज फडकविण्यात आला.

धार्मिक विधी, ग्रामदिंडी आणि हर घर भगवा उपक्रमांच्या माध्यमातून दिवसभर गावात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित हे विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. यात उपळा, शिंगोली, वरुडा, कुमाळवाडी व खताळवाडी या पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग या वेळी दिसून आला.

या संमेलनाच्या आयोजनासाठी हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष महेश पडवळ, सचिव डॉ कळमकर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोगरे, कोषाध्यक्ष काका घोगरे, निखिल गाढवे (वरुडा), औदुंबर पडवळ (शिंगोली), प्रसाद रणखांब (कुमाळवाडी), तसेच समितीतील १५० कार्यकर्त्यांसह श्रीसिद्धेश्वर हिंदू संमेलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पडल्याबद्दल आयोजकांनी नागरिकांचे आभार मानले.

## हरभरा खरेदीसाठी ई-पीक पाहणीची अट रद्द करा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**
राज्यातील शेतकऱ्यांना ऑनलाइन हरभरा खरेदी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ई-पीक पाहणीची अट तात्काळ रद्द करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकारी व राज्याच्या कृषी मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर हरभरा पिकाची लागवड केली जाते. शासनाने हरभरा खरेदी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू केली असली तरी नोंदणीसाठी ई-पीक पाहणी बंधनकारक केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन, इंटरनेट सुविधा किंवा तांत्रिक ज्ञानाचा अभाव असल्याने वेळेत ई-पीक पाहणी नोंदविता येत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी ऑनलाइन हरभरा खरेदी नोंदणीपासून वंचित राहत असून हमीभाव खरेदी योजनेचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर ऑनलाइन हरभरा खरेदीसाठी असलेली ई-पीक पाहणीची अट तात्काळ रद्द करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.

## ‘बळीराजा पाणंद रस्ते’ समितीच्या सह-अध्यक्षपदी शरण पाटील

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ मार्च -**
शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या ‘मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते’ योजनेच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी मतदारसंघनिहाय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने उमरगा-लोहारा मतदारसंघासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या सह-अध्यक्षपदी युवा नेते शरण बसवराज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी तसेच शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी सुलभ रस्ते उपलब्ध करून देण्यावर शासनाने विशेष भर दिला आहे. अनेक ग्रामीण भागांत पाणंद रस्त्यांचा अभाव असल्याने विशेषतः पावसाळ्यात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी पाणंद रस्त्यांचे जाळे उभारण्याचा शासनाचा मानस आहे.



शरण पाटील यांनी यापूर्वीही ‘शरण पाटील फाउंडेशन’च्या माध्यमातून अनेक गावांमध्ये स्वतःच्या खर्चातून पाणंद रस्त्यांची कामे करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत शासनाने त्यांना समितीच्या सह-अध्यक्षपदी जबाबदारी सोपवली असल्याचे सांगितले जाते.

या समितीमुळे उमरगा-लोहारा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांच्या कामांना अधिक वेग मिळणार असून शेतकऱ्यांना शेतीकामे व शेतीमाल वाहतुकीसाठी मोठी सुविधा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व शेतकरी संघटनांकडून शरण पाटील यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## लोकमंगल शाखेत ‘सन्मान स्त्रीशक्तीचा’ कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ मार्च -**
लोकमंगल मल्टीस्टेट अणदूर शाखेच्या वतीने ‘सन्मान स्त्रीशक्तीचा’ या उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिन उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी अणदूर व परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २५ महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अर्चना कस्तुरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रुपाली कानडे, कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका देशमुख, प्रा.जाधव तसेच डॉ. अनिता मुदकन्ना उपस्थित होत्या.

यावेळी प्रा. जाधव यांनी महिलांना मार्गदर्शन करताना परिस्थितीसमोर खचून न जाता धैर्याने लढत स्वतःला सक्षम बनवावे, असे सांगितले. अध्यक्ष डॉ. अर्चना कस्तुरे व डॉ. रुपाली कानडे यांनी महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी शाखाधिकारी प्रशांत जाधव यांनी लोकमंगल समूहाच्या विविध उपक्रमांची माहिती देत १० मे रोजी होणाऱ्या लोकमंगल सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी नावनोंदणी करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास शाखाधिकारी मारुती काळे, शिला माळी, गुंडय्या स्वामी, ऋषिकेश कुलकर्णी, सोमेश्वर स्वामी तसेच परिसरातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी गुंडय्या स्वामी यांनी आभार मानले.

## गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन; रिकामे सिलिंडर घेऊन निषेध



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**
देशात सातत्याने वाढत असलेल्या घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीमुळे व गॅस तुटवड्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असल्याचा आरोप करत धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार (दि.१२) रोजी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात काँग्रेस कार्यकर्त्यांनी रिकामे गॅस सिलिंडर डोक्यावर घेऊन तसेच रस्त्यावर चुली पेटवून केंद्र सरकारचा निषेध केला. वाढत्या गॅस दरांमुळे आणि सिलिंडरच्या तुटवड्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना पुन्हा लाकूड-फाट्यावर स्वयंपाक करण्याची वेळ येत असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, गॅस सिलिंडरचा तुटवडा दूर करावा आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली. तसेच रेल्वे प्रकल्प आणि सुरत-चेन्नई महामार्गासाठी जमीन गेलेल्या बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.

## परंडा न.प.ची वार्षिक सर्वसाधारण सभा; विविध ठरावांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ मार्च -**
परंडा नगरपरिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा नगरपरिषदेच्या सभागृहात नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेस मुख्याधिकारी मनीषा वड्डेपल्ली, कार्यालय अधीक्षक जगदीश सोंडगे, मुनीर जिकरे यांच्यासह सत्ताधारी व विरोधी नगरसेवक उपस्थित होते.



सभेत मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी आवश्यक साहित्य व सेवा पुरवठ्यासाठी निविदा मागविण्याबाबत चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आला. भांडार, पाणीपुरवठा, बांधकाम, लेखा व इतर विभागांसाठी लागणाऱ्या साहित्य खरेदी व सेवा पुरविण्यासाठी वार्षिक निविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच सन २०२६-२७ या वर्षासाठी आठवडी व दैनंदिन बाजाराच्या वसुलीसाठी ई-लिलाव करण्याचा विषय सभेसमोर आला. काही नगरसेवकांनी बाजार लिलाव न करता नगरपरिषद कर्मचाऱ्यांकडून कर वसुली करण्याची सूचना केली.

मात्र यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने तसे करणे शक्य नसल्याचा अभिप्राय मुख्याधिकारी मनीषा वड्डेपल्ली यांनी दिला.

त्यामुळे आठवडी व दैनंदिन बाजाराचा जाहीर ई-लिलाव शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नियमानुसार ठेका देण्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

याशिवाय सेवानिवृत्त सफाई कर्मचारी महादेव दगडू ओव्हाळ यांना शासन निर्देशानुसार सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ देण्याच्या प्रस्तावालाही सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

## उन्हाची चाहूल; उमरग्यात कुलर-फॅनच्या खरेदी व दुरुस्तीला वेग



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ मार्च -**
यंदा उन्हाळ्याची चाहूल नेहमीपेक्षा लवकर लागल्याने उमरगा शहरात कुलर आणि फॅनच्या खरेदी-दुरुस्तीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात वाढ जाणवू लागल्यामुळे नागरिकांनी उन्हाळ्याची तयारी सुरू केली आहे. घरातील जुने कुलर व पंखे दुरुस्त करून घेण्यासाठी तसेच नवीन कुलर-फॅन खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक दुकानांकडे धाव घेत असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

शहरातील इलेक्ट्रिक व रिपेअरिंग दुकानांमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ वाढली असून कारागीरही दुरुस्तीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. साधारणपणे एप्रिल महिन्यापासून कुलर-फॅनच्या दुरुस्ती आणि विक्रीला वेग येतो. मात्र यंदा मार्च महिन्यातच उकाडा वाढल्याने नागरिकांनी आधीच तयारीला सुरुवात केली आहे.

परिणामी शहरातील अनेक दुकानांमध्ये दिवसभर ग्राहकांची ये-जा सुरू असून दुरुस्तीबरोबरच नवीन कुलर-फॅनची खरेदीही वाढत आहे. काही नागरिक जुन्या कुलरची मोटर, पाण्याचा पंप, वायरिंग किंवा कुलर पॅड बदलून घेत आहेत, तर काहीजण नवीन कुलर आणि पंखे खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत.

सध्या रिपेअरिंगच्या दुकानांमध्ये कुलरची मोटर, पंप, वायरिंग, कुलर पॅड बदलणे तसेच पंख्यांचे कॅपेसिटर, कॉइल आणि ब्लेड दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

### कुलर वापरताना घ्यावी विशेष काळजी...

उन्हाळ्यात कुलरचा वापर वाढत असल्याने त्याचा वापर करताना काही बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कुलरमध्ये पाणी भरताना किंवा साफसफाई करताना वीजपुरवठा बंद आहे याची खात्री करून घ्यावी. घाईगडबडीत पाणी टाकताना किंवा कुलर साफ करताना विद्युत धक्का लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच कुलरमध्ये पाणी भरताना ते वायरिंग किंवा मोटरजवळ सांडणार नाही याची दक्षता घ्यावी. पाण्यामुळे शॉर्टसर्किट होण्याचा धोका असतो. त्यामुळे कुलर योग्य ठिकाणी ठेवणे आणि पाण्याचा वापर करताना काळजी घेणे आवश्यक आहे.


### जाहीर प्रसिध्दीकरण

किरकोळ अर्ज नंबर १२६/२०२५
निशान क्र. ०५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब, यांचे कोर्टात**

१. **श्रीमती पुजा विलास मोरे,** वय-३० वर्षे धंदा-घरकाम
२. **कु अपुर्वा विलास मोरे,** वय-११ वर्षे धंदा-शिक्षण
३. **कु. अनुजा विलास मोरे,** वय ९ वर्षे, धंदा शिक्षण
नं २ व ३ अपाक जनक आई अर्जदार नंबर १
द्वारा-सुनिता नवनाथ अळकुटे ह. मु वडारवाडी भिंगार, अहमदनगर
४. **जनार्धन लक्ष्मण मोरे,** वय-७८ वर्षे, धंदा काहीनाही, रा. बाजार रोड, भुम, ता. भुम जि धाराशिव, मो नं ९८६०८४८५५९
**अर्जदार**

**विरूद्ध**
**कोणीही नाही.** --- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप सर्टफिकेट मिळण्यासाठी.**

**ज्याअर्थी,**
अर्जदार हे अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावरील कायमचे राहणारे आहेत. अर्जदार नंबर १ हिचे पती व अर्जदार नंबर २ व ३ यांचे वडील व अर्जदार नंबर ४ यांचा मुलगा नामे विलास जनार्धन मोरे रा. बाजार रोड ता. भुम जि धाराशिव हे महाराष्ट्र राज्य विदुयत पारेषण कंपनी मर्यादीत यांचे अंतर्गत कुरुळी, ता. खेड, जि. पुणे येथे तंत्रज्ञ-२ या पदावर कायमस्वरुपी नोकरीस होते, ते दि.२१/११/२०२४ रोजी शैलजा स्पेशालिटी हॉस्पीटल, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत **विलास जनार्धन मोरे** यांची आई लक्ष्मीबाई जनार्धन मोरे ही दि.२६/०१/२०२२ रोजी मयत झालेली आहेत. त्यामुळे मयत **विलास जनार्धन मोरे** यांचे नावावर मृत्यूपश्चात असणारे तसेच अनुकंपा खाली अर्जदार नं. १ हिस नोकरी मिळणेसाठी महाराष्ट्र राज्य विदुयत पारेषण कंपनी मर्यादित यांचेकडे नोकरी मिळणेसाठी अर्ज केला असता त्यांनी अर्जदारांना तोंडी मयताचे वारस असलेबाबत मे. कोर्टाकडून हेअरशिप सर्टिफिकेट आणले शिवाय मयताचे जागेवर अनुकंपा तत्त्वावर नौकरी मिळणार नाही तसेच मृत्यूपश्चात देय असणारे लाभ देता येणार नाहीत असे सांगितले आहे. त्यामुळे यातील अर्जदार नं. १ ते ४ हे मयत विलास जनार्धन मोरे यांचे हिंदू वारसा कायदयाप्रमाणे मयतास एकमेव व कायदेशीर वारस आहेत असे ठरवून हेअरशिप सर्टिफिकेट मिळावे याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

**त्याअर्थी,**
२००६ सदर अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त मयत **विलास जनार्धन मोरे** यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता.२०/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.
**कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्कयानिशी दिले असे. ता.१०/११/२०२५**

स्वाक्षरित /- (वरिष्ठ लिपीक) | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित /- (सहाय्यक अधिक्षक)

**मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी.**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# जगणे आणि जिवंत असणे...

जन्माला आलेल्या प्रत्येक सजीवाचा श्वास सुरू असतो तोवर तो जिवंत असतो. ज्या क्षणी श्वास बंद होतो, त्या क्षणी त्याचा जिवंतपणा संपतो. म्हणजे, जिवंत असणे हे केवळ दोन श्वासांमधील अंतर असते. त्यालाच जीवन असे म्हटले जाते. जिवंत असणे आणि जगणे यांमध्ये फार मोठे अंतर असते. जन्माला आलेला प्रत्येक जण मरण येईपर्यंत जिवंत राहत असला, तरी केवळ श्वास सुरू असल्यामुळे पुढे सरकत राहिलेल्या या जिवंतपणाच्या काळात तो कसा जगला, यावर जगण्याचे सार्थक झाले किंवा नाही ते ठरविले जाते. आयुष्य ही अपघाताने मिळालेली देणगी असते. जन्म ही आपल्या इच्छेनुसार करता येणारी निवड नसते. ते स्वीकारायचे की नाही, हे आपण ठरवू शकत नसलो, तरी आपल्या वाट्याला आलेले जीवन कसे जगायचे, त्याला कोणता अर्थ आणि आकार द्यायचा हे मात्र आपण ठरवू शकतो. जीवनाची लांबी किती होती, यावर जगण्याचा अर्थ ठरत नसून निसर्गाने दिलेल्या जन्माचे जगणे झाले किंवा नाही, यावर तो ठरत असतो. जीवन जगण्याची ताकद गमावली की जगणे म्हणजे केवळ श्वास घेणे असते. असा जन्म मिळणे, असे आयुष्य वाट्याला येणे हेदेखील अनेकदा आपल्या हातात नसते, त्यामुळेच असे आयुष्य जगत राहायचे किंवा नाही, हे ठरविणे तरी आपल्या हातात असले पाहिजे, या मागणीसाठी दीर्घकाळापासून सुरू असलेल्या संघर्षाला आता काहीशी दिशा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जीवन जगण्याची हीच स्वातंत्र्यपूर्ण निवड माणसाला, त्याच्या अस्तित्वाला अर्थ देण्याची ताकद प्रदान करते, या विचारांना मान्यता मिळण्याचे संकेत आता मिळू लागले आहेत.

सर्वोच्च न्यायालयासमोरील एका मानवतावादी खटल्याच्या निकालात न्यायालयानेही हाच विचार केल्याने, जिवंत राहणे आणि जगणे यांच्यातील फरक आता स्पष्ट होणार आहे. श्वास घेणारा प्रत्येक सजीव काळासोबत जिवंत राहत असतो, पण त्याचे जिवंत असणे निर्जीव वस्तूसारखेच असेल, त्याला सन्मानाने जगण्याचा हक्क बजावता येत नसेल, तर त्याला सन्मानपूर्वक मृत्यूला सामोरे जाण्याचा हक्क तरी मिळावयास हवा, यावर गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या सामाजिक विचारमंथनातून काही ठोस निष्पन्न होण्याची चिन्हे आता दिसू लागली आहेत. पंजाब विद्यापीठात शिक्षण घेत असताना एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून अंतर्बाह्य शारीरिक दुखापतींमुळे गेल्या १३ वर्षांपासून मरणासन्न बेशुद्धावस्थेत असलेल्या हरीश राणा या तरुणास कृत्रिमरीत्या जिवंत ठेवण्यासाठी लावलेली जीवरक्षक उपचार प्रणाली काढून त्याला सन्मानपूर्व नैसर्गिक मृत्यू पत्करण्यास परवानगी मिळाली. या मागणीसाठी त्याच्या जन्मदात्यांनी केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेतून एका प्रदीर्घ चळवळीला बळ मिळाले आहे. वैद्यकीय भाषेत ज्याला निष्क्रिय इच्छामरण म्हटले जाते; त्यास न्यायालयीन परवानगी देणारा हा निकाल ऐतिहासिक ठरला आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येकास सन्मानाने जगण्याचा मूलभूत हक्क आहे, असा निकाल सन २०१८ मध्येच देऊन सर्वोच्च न्यायालयाने एक प्रकारे निष्क्रिय इच्छामरणाच्या पाठपुराव्याच्या प्रयत्नांना आशेचा किरण दाखविला होता. आता हरीश राणा याच्या प्रकृतीची संपूर्ण तपासणी करून घेतल्यानंतर व त्याच्या प्रकृतीत पूर्ववत सुधारणा होण्याची व तो पूर्णपणे ठणठणीत होण्याची सूतराम शक्यता नसल्याची खात्री करून घेतल्यानंतर त्याच्या निष्क्रिय इच्छामरणाच्या हक्कावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. जीवरक्षक उपचार प्रणालीद्वारे केवळ जिवंत राहण्यापेक्षा ती प्रणाली बंद करणे हा त्याच्या सन्मानाने जगण्याच्या व सन्मानपूर्वक मरण्याच्याही हक्काचा सन्मान ठरेल, असाच विचार कदाचित न्यायालयाने केला असावा. कारण, निकालपत्राच्या प्रारंभीच न्यायालयाने जगणे आणि जिवंत असणे यांतील फरकाचा परामर्ष घेतलेला दिसतो. तुला जन्म हवा आहे किंवा नाही, असे ईश्वर कोणाही व्यक्तीस विचारत नसतो. त्यामुळेच जन्माला येणे ही कोणाच्या पसंतीची किंवा नापसंतीची बाब नसते. ते स्वीकारावेच लागते आणि म्हणून जन्माला आल्यानंतर आयुष्य कसे जगायचे हे ठरविण्याचा अधिकार त्याला असतो, हे हेन्री वॉर्ड बीचर या अमेरिकन धर्मोपदेशकाचे वाक्य निकालपत्रात उद्धृत करून न्यायालयाने हरीश राणा यास सन्मानाने मरण देण्याच्या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिला असावा.


सुमारे १० वर्षांपूर्वी, १८ मे २०१६ या दिवशी, मुंबईतील अरुणा शानबाग नावाच्या एका परिचारिकेच्या तब्बल चार दशकांच्या जीवनमरणाच्या संघर्षाचा शेवट झाला, तेव्हाच सन्मानपूर्वक मृत्यूच्या मागणीची दीर्घकाळापासून प्रतीक्षा पुन्हा एकदा प्रबळ झाली होती. जिवंतपणी मरणयातना भोगल्याने माणूसपण हरवलेली अरुणा शानबाग नावाची ही महिला जवळपास ४० वर्षे मुंबईच्या केईएम इस्पितळाच्या बिछान्यात संवेदनाहीन अवस्थेत पडून राहिलेली होती. अशा मरणप्राय जिवंतपणातून तिला मुक्ती द्यावी, यासाठी दयामरणाचा किंवा इच्छामरणाचा लढा तिच्या संवेदनाहीन जिवंतपणीच सुरू झाला होता. सजीवपणाचे लक्षण सांगणाऱ्या सर्व संवेदना हरवलेल्या अवस्थेत किंवा जगण्यामरण्याच्या जाणिवा संपलेल्या अवस्थेत केवळ श्वास घेत जगत राहण्यापेक्षा, समाधानाने मृत्यूला सामोरे जाण्याची किंवा मरण देण्याची मागणी अनेक दशकांपासून अनेकांकडून सातत्याने सुरू होती. जन्म घेणे आपल्या हाती नाही, पण मरण तरी आपल्या हाती असले पाहिजे, असा दावा करीत इच्छामरणाचे असंख्य पुरस्कर्ते सरकार दरबारी याचना करीत वर्षानुवर्षे कायद्याकडे डोळे लावून बसले होते.

शक्य तितक्या अधिक काळ जगण्याची असोशी प्रत्येकाला असली, तरी 'मृत्यू' हेच जिवंतपणाचे एकमेव लक्षण असते, हे मान्य केले पाहिजे. कारण मृत्यू हा केवळ जिवंतांच्याच वाट्याला येणारे नैसर्गिक घटित असते. असंख्य निर्जीव दगडधोंडे वर्षानुवर्षे त्याच स्थितीत पडून असतात. त्यांच्या जन्माला स्वयंभू कहाण्या नसतात. त्या निरीच्छ धोंड्यांना कसल्याच संवेदना नसतात. सृष्टीतील सुख-दुःखाच्या कोणत्याही घडामोडींचा त्यांच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नसतो आणि त्यांना मृत्यूची वेदनाही नसते. म्हणून सजीवपण हे वेगळेपण ठरते आणि मृत्यू हा त्याचा शेवटचा क्षण असतो. अत्यंत दुर्धर आजाराने ग्रासलेल्या, केवळ मरण येत नाही एवढेच जिवंतपणाचे कारण असलेल्या व्यक्तीस दयामरण देण्यासंदर्भातील कायदा करण्यापूर्वी जनमत आजमावण्याचा एक निर्णय त्याच काळात केंद्र सरकारने घेतला. इच्छामरण, दयामरण या बहुचर्चित विषयाचे अनेक अंगांनी मंथन सुरू झाले. सन्मानाने जगण्याची कोणतीच लक्षणे उरलेली नसल्याच्या अवस्थेत जगणाऱ्या रुग्णांची संख्याही वाढत असल्याने दयामरण हा सन्मानपूर्वक मृत्यू तरी ठरेल, असा मतप्रवाह चर्चेत आला. आसन्नमरण अवस्थेतील व्यक्तीला उपचाराने जगविणे हे नैसर्गिक जगणे ठरणार नाही; त्याला तशा अवस्थेत जगविणेदेखील उचित नाही, असे वैद्यकीय क्षेत्रातील अनेक जण मान्य करीत असले, तरी जगविणे हीच त्या क्षेत्राची नीती असल्याने दयामरण हे वैद्यकीय व्यवसायाच्या नैतिकतेला धरून नाही, असाही दावा केला गेला होता. अरुणा शानबाग यांना दयामरण देण्याच्या मागणीसाठी दाखल झालेल्या याचिकेवर निर्णय देताना, इच्छामरण हा गुन्हा नाही, असे मत न्यायालयाने नोंदविले होते. त्यामुळे दयामरण आणि इच्छामरणाच्या मुद्यावर सकारात्मक विचार करण्याची मानसिकता तरी सुदृढ होऊ लागली. मृत्यू ही आनंददायी घटना नाही, हे आपण भावनिकदृष्ट्या स्वीकारलेले सत्य असले, तरी मृत्यू टाळता येत नाही, हेदेखील सत्य आहे. सजीवाचे या जगात येणे ज्या क्षणी निश्चित होते, त्याच क्षणी त्याचे जाणेही निश्चित असते. त्यामुळे मृत्यूकडे मानवतेचा किंवा सजीवांचा शत्रू वगैरे दृष्टीने पाहण्यापेक्षा नैसर्गिक अपरिहार्यता म्हणून बघितले पाहिजे. आपला जन्म हे जीवशास्त्रीय घटित असेल तर मृत्यूही जीवशास्त्रीय घटितच असते. काही वेळा हे घटित लांबणीवर पडत असेल आणि एखाद्याला मरण समोर दिसत असूनही त्याला नुसत्या वेदना सोसत दिवस काढावे लागत असेल तर असा कायदेशीर पर्याय उपलब्ध असण्यासाठी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. शेवटी जगणे आणि जिवंत असणे यात फरक असतोच.

## प्रासंगिक

# 'युद्धे का होतात' मला माहिती नाही!

**विजय पांढरीपांडे**



युद्धे का होतात हा मला पडलेला प्रश्न आहे. माझे राजकारणाचे ज्ञान मुळातच मर्यादित आहे. आजकाल अवतीभवतीचे राजकारण इतके गलिच्छ झाले आहे की, त्याबद्दल खोलात न शिरलेलेच बरे! युद्धाचा संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणाशी असतो. तो विषय तर अधिकच किचकट! आपल्याकडे अगदी रामायण-महाभारतापासून युद्धाच्या सुरस चमत्कारिक कथा आपण लहानपणापासून ऐकत आलोय. 'युद्धस्थ कथा रम्या' असे प्रचलित वचन आहे. शाळेत अभ्यासक्रमाचा भाग म्हणून इतिहासातील युद्धाच्या सुरस कथा आपण वाचल्या आहेत. मार्क मिळविण्यासाठी ती सनावली पाठदेखील केली आहे; पण त्यातून काहीच शिकलो नाही. कारण त्या वयात शिकण्यासारखे काही नव्हतेच त्या इतिहासात. पुढे होऊन गेलेल्या दोन महायुद्धाच्या कथा काहींनी अभ्यासल्या असतील, वाचल्या असतील. तरीही नेमकी युद्धे का होतात? एकमेकाच्या सहकार्याने जगू पाहणारा, प्रगती करणारा माणूस एकमेकाच्या अंगावर का धावून जातो? एकमेकांचा संहार करण्याला का प्रवृत्त होतो?

तसे पाहिले तर एकूणच जगाच्या बहुतांश भागात भरपूर प्रगती झाली आहे. माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होण्याइतकी समृद्धी आली आहे. समाजात गरिबी-श्रीमंती असे भेद असले, तरी पूर्वीइतकी हलाखीची परिस्थिती फार कमी भागात आहे पूर्वीच्या तुलनेत. मुख्य म्हणजे जे युद्धासाठी सरसावले आहेत ते सगळे बऱ्यापैकी चांगले जीवन जगताहेत. शांततेत जगले तर ते अधिक पुढे जाऊ शकतात. अवतीभवतीची परिस्थिती आहे त्यापेक्षा अधिक चांगली घडवू शकतात. स्वतःच्या सर्व गरजा पूर्ण करून इतरांना बरेच काही देऊन सुखी करू शकतात. मग या राष्ट्रप्रमुखांना ही युद्धाची अवदसा का आठवते? हा भीषण नरसंहार, हे अमानुष क्रौर्य कशासाठी? समाज कितीही प्रगत झाला तरी त्याची मूलभूत स्वार्थी प्रवृत्ती बदलत नाही. जे काही चांगले ते फक्त मलाच, आम्हालाच मिळाले पाहिजे. इतरांना म्हणजे कधीतरी केव्हातरी ज्यांनी आपल्याला त्रास दिला, ज्यांच्यामुळे आपल्याला अडचणी आल्या, त्यांना आपल्या सुखात आपल्याला सहभागी करून घ्यायचे नसते. याला वर्णभेद, वंशभेद, जातिभेद... काहीही नाव द्या. समाज जसजसा विकसित झाला तशा या भेदाच्या पोलादी भिंती अधिकाधिक उंच होत गेल्या. विषमता वाढतच गेली. द्वेष-मत्सर भावना कमी होण्याऐवजी तीव्र होत गेली. प्रत्येकाचे आपापले धर्मग्रंथ आहेत. पारंपरिक संस्कारातून आलेली चांगली शिकवण आहे. कुठलाही धर्म, कुठलीही संस्कृती इतरांचे वाईट करा, इतरांना तुच्छ लेखा, एकमेकांचा संहार करा,असे मुळीच सांगत नाही. भाषा वेगळी असेल, सांगण्याची पद्धत वेगळी असेल, पण प्रत्येक धर्म, प्रत्येक राष्ट्राची संस्कृती ही प्रेम, दया, सहानुभूतीचीच शिकवण देते. तरीही युद्धे का होतात? लोकशाही मार्गाने निवडून आलेली, स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवणारी सुशिक्षित नेते, राज्यकर्ते एकदम थेट युद्धाचे रणशिंग का फुंकतात? हा विनाशी निर्णय घेणाऱ्या नेत्यांच्या मागे त्यांचे लोक असतात का? त्यांनाही हा भीषण नरसंहार, रक्तपात मान्य असतो का? तसे वाटत नाही. कारण सामान्य माणसाला सुखा-समाधानात, शांतीने जगण्यात रस असतो फक्त. देशाच्या सीमा, त्यावरून होणारे वाद, दोन देशातले व्यापारी संबंध, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव यामुळे त्याच्या आयुष्यावर फारसा काही फरक पडणार नसतो. त्याच्या, कुटुंबाच्या गरजा पूर्ण झाल्या की सामान्य माणूस सुखी-आनंदी असतो. हे राजकारण, हा धार्मिक द्वेष, हा वर्ण-वंश भेद ही मूठभर सत्ताधारी राजकारणी मंडळींची मक्तेदारी असते. ही त्यांची वैयक्तिक मिजास असते. स्वतःचा अहं जोपासण्यासाठी, स्वतःचे राजकीय महत्त्व राखण्यासाठी, खरे म्हणजे स्वतःची सत्ता शाबूत ठेवण्यासाठी ही निवडक मंडळी हा जीवघेणा खेळ खेळत असतात.

सध्या हेच चालू आहे. महाभारतापासून चालत आलेल्या, पहिल्या-दुसऱ्या महायुद्धात पुनरावृत्ती झालेल्या नाटकाचीच ही नवी आवृत्ती आहे. यात निरपराध स्त्रिया-मुलांचे जीव जातील, सीमेवरचे हजारो सैनिक मारले जातील, शहरे उद्ध्वस्त होतील, रोगराई वाढेल, जागतिक अर्थव्यवस्था कोसळून पडेल. खरे तर आपल्यापैकी कुणालाच हे नको आहे. कुठल्याही देशाच्या नागरिकांनी त्यांच्या राष्ट्र प्रमुखांना या सर्वनाशाचे, निरपराध नागरिकांचे, स्त्रिया-मुलांचे जीव घेण्याचे, नागरी संपत्ती नष्ट करण्याचे, झालेला विकास भुईसपाट करण्याचे अधिकार त्यांच्या राज्यकर्त्यांना दिलेले नाहीत. जे कुणी दहशतवादी असतील, जागतिक शांततेच्या आड येत असतील, निरपराध नागरिकांवर अत्याचार करत असतील, अशा मूठभर विद्रोह्यांना जरूर कठोर शिक्षा द्या. त्यांना हवे तर फाशी द्या; पण आपल्या सत्तालोलूप वृत्तीपायी, स्वार्थ जोपासण्याच्या हट्टापायी हे मूठभर शासन करते. जर जगाला वेठीस धरणार असतील तर हे आपण किती खपवून घ्यायचे, हा खरा प्रश्न आहे. मला उत्तर माहिती नाही. कारण मला यातले फारसे काही कळत नाही!

७६५९०८४५५५

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# वैद्यकीय समाजसेवेचा नवा अध्याय; सेवांकुर


शिक्षण आणि वैद्यकीय सेवा या दोन गोष्टींचा समाज पर्यायाने देश उभारणीत मोठा हातभार आहे. परंतु, आज तो 'होता' असे म्हणावे लागते. कारण, ही दोन्ही क्षेत्र सध्या नाराजीच्या सुरात अडकत चालली आहेत. दोन्ही क्षेत्रात अपवाद आहेतच! डॉक्टरांना 'देव' संबोधले जाते. परंतु, डॉक्टरांचे रुग्णांसोबत असलेले व्यवहार, रुग्ण भरती करण्यापूर्वी आगाऊ रकमेची मागणी करणे, अनावश्यक रक्त चाचण्या आदी बाबींविषयी समाज व्यवस्थेत प्रचंड नाराजी आहे. अगदी चार दिवसांपूर्वी वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (श्या.) येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याने रुग्णवाहिकेत मरणासन्न असलेल्या रुग्णाला रस्त्यावर सोडून रुग्णवाहिका परत बोलवण्याचा उद्दामपणा केला. परिणामी, त्याच रात्री तो रुग्ण दगावला. अशा या सोकावत जाणाऱ्या भावनांच्या भाऊगर्दीत वैद्यकीय शिक्षणातून समाजसेवेने मंतरलेली चळवळ भारतातील सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात सेवा देते झाली. डॉक्टर हा केवळ व्यावसायिक नसतो तर समाजाचा विश्वास आणि जीवनाशी जोडलेली जबाबदारी त्याच्यावर असते. अशाच विचारातून आणि राष्ट्रीय प्रेरणेतून सेवांकुर ही चळवळ उदयास आली. १९८९ च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथे सात डॉक्टरांनी एकत्र येत डॉ. हेडगेवार हॉस्पिटलची स्थापना केली. वैद्यकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि सेवेला केंद्रस्थानी ठेवत आरोग्यसेवा उभी केली. १९८९ ते १९९७ या काळात रुग्णालयाची प्रगती वेगाने होत गेली. हॉस्पिटलचा विस्तार झाला. ७०० खाटांच्या मोठ्या रुग्णालयात रूपांतरित झाले. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट डॉक्टर बनवले जाते. ते संवेदनशील नागरिक बनावेत, समाजातील दुःख समजून घ्यावे आणि सेवा करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी काहीतरी वेगळे करणे आवश्यक असल्याची जाणीव निर्माण झाली. यातूनच डॉक्टरांमध्ये आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये समाजभान रुजवण्यासाठी एक नवीन चळवळ सुरू करण्याचा विचार पुढे आला. सुरुवातीला काही डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी आठवड्यातून एकदा अनौपचारिकपणे भेटू लागले. चर्चा होत, अनुभवांचे आदानप्रदान होऊ लागले. हळूहळू या उपक्रमाला आकार येऊ लागला. त्या चर्चांतून प्रत्यक्ष काम करण्याची प्रेरणा मिळू लागली. गावाकडे जाऊन आरोग्य शिबिरे घेणे, समाजातील दुर्बल घटकांशी संवाद साधणे, ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोकांच्या अडचणी समजून घेणे अशी कामे सुरू झाली. याच विचारातून 'सेवांकुर'चा जन्म झाला. सेवांकुर या नावातच त्याचा अर्थ दडलेला आहे. सेवा ही एक वृत्ती आहे आणि ती अंकुरासारखी रुजवावी लागते. योग्य संस्कार मिळाले तर हा अंकुर पुढे मोठ्या वृक्षात रूपांतरित होतो, हे या चळवळीने सिद्ध करून दाखवले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातील ज्ञानावर समाधान मानू नये, तर प्रत्यक्ष समाजात जाऊन लोकांचे जीवन समजून घ्यावे, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी आपले ज्ञान वापरावे, हा सेवांकुरचा मूलभूत विचार आहे. द्वितीय सरसंघचालक गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त याच चळवळीतून नाशिक येथे ३०० खाटांचे रुग्णालय उभे झाले. सन २०१५-१६ च्या काळात सेवांकुरला एक संघटित स्वरूप प्राप्त झाले. विविध राज्यांमधील वैद्यकीय महाविद्यालये आणि विद्यार्थी या उपक्रमाशी जोडले जाऊ लागले. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, देवगिरी विभाग, छत्तीसगड, मध्यप्रदेश, झारखंड, तेलंगणा, गोवा या राज्यातील जवळपास २६० वैद्यकीय महाविद्यालयांतील सुमारे १३०० विद्यार्थी या चळवळीशी जोडले गेले आहेत. सेवांकुरचा सर्वात महत्त्वाचा आणि प्रभावी उपक्रम म्हणजे 'वन वीक फॉर नेशन.' या उपक्रमाच्या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना आदिवासी आणि दुर्गम भागातील समाजजीवन जवळून अनुभवण्याची संधी दिली जाते. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी विद्यार्थी एक आठवडा आदिवासी भागात राहतात. ते त्या समाजातील कुटुंबांचे सदस्य होतात. त्यांच्या जीवनशैलीचा अनुभव घेतात आणि त्यांच्या आरोग्याशी संबंधित समस्या समजून घेतात. वैद्यकीय तपासणी शिबिरे, आरोग्य जनजागृती, पथनाट्य, स्वच्छता अभियान, बालक व महिलांसाठी आरोग्य मार्गदर्शन या माध्यमातून आदिवासी समाजाला बाहेरील जगाची ओळख करून दिली जाते. पुढील वर्षी या उपक्रमाला एक तप पूर्ण होणार आहे. 'वन वीक फॉर नेशन' या उपक्रमात आतापर्यंत तीन हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. त्यांनी छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तरप्रदेश येथे सेवा दिली. रुग्णालयात बसून रोगांचा अभ्यास करणे एक गोष्ट, पण समाजात जाऊन लोकांच्या जीवनातील अडचणी समजून घेणे ही वेगळीच गोष्ट आहे. संभाजीनगरातील 'सप्तर्षी' डॉक्टरांनी सुरू केलेला प्रवास आज हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. सेवांकुरच्या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये सेवाभावाचा अंकुर रुजत आहे. तोच भाव समाजातील अन्य घटकांमध्ये रुजावा... डॉक्टरांतील (अपवादात काही डॉक्टर देव आहेत) देव परत यावा...

९८८१९०३७६५

## दखल

# उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी होणार?

**मोरेश्वर बडगे**



विधानपरिषदेच्या ९ सदस्यांची मुदत १३ मे रोजी संपत आहे. ज्यांची मुदत संपते आहे त्यात माजी मुख्यमंत्री आणि उबाठाचे सुप्रीमो उद्धव ठाकरे हे एक आहेत. या साऱ्या जागा भरण्यासाठी येत्या एप्रिलमध्ये निवडणूक होईल. गेल्या दोन विधान परिषद निवडणुकांचा अनुभव चांगला नाही. येती निवडणूकही धक्कादायक निकाल देऊ शकते. संख्याबळ पाहिले तर महायुतीकडे एकूण २३५ आमदार आहेत. त्यामुळे महायुतीचे सात उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. महाविकास आघाडीची एक जागा नक्की निवडून येऊ शकते. कोण येणार या जागी? संख्याबळाचा विचार केला तर महाविकास आघाडीकडे अवघे ४६ आमदार आहेत. लहानसहान पक्ष गोळा केले तरी हा आकडा ५५ जागांच्या पुढे जात नाही. उद्धव यांची यावेळी अग्निपरीक्षा आहे. त्यांना पाडण्याची संधी शिंदेसेना सोडणार नाही. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीमधल्या उद्धव ठाकरे यांच्या उबाठाने स्वतःच्या वाट्याची जागा सोडून राष्ट्रवादीच्या एका गटाचे सुप्रीमो शरद पवार यांना पाठवले होते. त्यामुळे यावेळी उबाठा म्हणजे उद्धव ठाकरे हे विधान परिषदेसाठी दावा ठोकणारच. अशा वेळी काँग्रेस काय भूमिका घेते ते पाहणे महत्त्वाचे राहणार आहे. महापालिका निवडणुकीत काँग्रेसने स्वबळाची भूमिका घेतली होती. त्यामुळे उबाठाला तब्बल ३० जागा गमवाव्या लागल्या होत्या. राज्यसभा निवडणुकीतही काँग्रेस अडून बसली होती. आता मामला विधान परिषदेचा आहे. सारं वाटत राहिलो तर आपल्या हातात काय राहील, असा प्रश्न काँग्रेसला पडणे साहजिक आहे. काँग्रेस अडून बसली तर उद्धव ठाकरे यांचे अवघड आहे. उबाठा आणि काँग्रेस यांच्यात एकमत झाले तरच मार्ग मोकळा होऊ शकतो. पण उबाठाला काँग्रेसची साथ मिळेल का? अवघड प्रश्न आहे. मुळात उद्धव यावेळी लढायला उत्सुक आहेत का, हाही प्रश्न आहे. ते उभे राहतील की आपल्या सहकाऱ्याला उभे करतील? एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातले सरकार कोसळले होते. त्यावेळी ठाकरे यांनी पदाचा राजीनामा दिला होता. मात्र आमदारकी सोडली नव्हती. त्यामुळे आताही ते विधान परिषदेला उभे राहतील, असा त्यांच्या चाहत्यांचा अंदाज आहे. खासदारकी नाही आणि आता आमदारकीही नसेल तर आपण बाजूला पडू, अशी भीती ठाकरेंना आहे. आमदार म्हणून भलेही ते सभागृहात फार बसत नसतील, प्रश्नही विचारत नसतील, तरीही विधानपरिषद ते सोडणार नाहीत. कारण त्यांना संदर्भहीन व्हायचे नाही. पण आमदारकीचा त्यांचा महामार्ग नव्या परिस्थितीत अवघड वाटतो. गुप्त मतदान झालं तर मतं फोडण्याची रणनीती उद्धव यांना खाऊन टाकेल. निवडणूक बिनविरोध होऊ नये असाच सत्ताधाऱ्यांचा आणि खासकरून शिंदेसेनेचा प्रयत्न असेल. त्यात घोडेबाजार होऊन उद्धव यांचा गेम होऊ शकतो. गेल्या दोन्ही विधानपरिषद निवडणुकीत मतं फुटली होती. आता ती फुटणार नाहीत हे कशावरून? उद्धव यांना नक्की ते टेन्शन असणार.


काँग्रेसच्या दबावतंत्राची सध्या एकनाथ शिंदे यांची शिवसेना मजा घेत आहे. शिंदे सेनेचे नेते खासदार नरेश मस्के यांनी उबाठाला जोरदार टोला हाणला आहे. 'गरज असेल तर शिंदे यांच्याशी संपर्क साधा. फोन केला तरी काम होऊन जाईल' असा खोचक टोला मस्के यांनी उबाठाला मारला. मस्के यांनी एक प्रकारे ठाकरेंना डिवचलंच आहे. शरद पवारांच्या उमेदवारीसाठी ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत सक्रिय होते. तेच संजय राऊत आता उद्धव ठाकरे यांच्यासाठी पुढाकार घेत आहेत. चार वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंड करून ठाकरे सरकार पाडले होते. तो हिशोब चुकता करण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न राहील. पण महायुतीचा चाणक्य ते घडू देईल? शरद पवारांना लढवायला उबाठा आणि काँग्रेस दोघेही तयार नव्हते. मात्र 'शरद पवार यांच्यापेक्षा दुसरा उमेदवार देणार असाल तर आम्ही पाडू' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच सांगितले होते. त्यामुळे दोघांची गोची झाली. एका अर्थी फडणवीसांनी दिलेला उमेदवार (शरद पवार ) निमूट स्वीकारावा लागला. आता विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध होणार की दहावा उमेदवार देऊन एकनाथ शिंदे रंगत आणणार? याकडे सर्वांचे लक्ष आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात येणारी तीन-चार वर्षे अनेकांसाठी जीवनमरणाची राहणार आहेत. उद्धव ठाकरे राज्याच्या राजकारणातून संपल्यात जमा होतील. त्यांचे खासदार-आमदार फुटून भाजपा किंवा शिंदे यांच्या आश्रयाला जातील. एकनाथ शिंदे 'बेडूक' होऊ पाहत आहेत. पण २०२९ च्या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा कळेल. शिंदे सेना भाजपामध्ये विलीन झाली तर आश्चर्य वाटायला नको. या निवडणुकीअखेर राज्यात दोनच पक्ष राहतील. एक भाजपा आणि काँग्रेस. शरद पवार आणि सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी चटणीला उरतील. उद्धव ठाकरे यांना भवितव्य होते. मात्र अहंकाराने त्यांना गिळले. शरद पवारांच्या नादी लागून त्यांनी स्वतःचे तर नुकसान करून घेतलेच; पण वडिलांनी स्थापलेला पक्षही इतरांनी नेला. राज्यसभेची एक जागा मिळविण्यासाठी ठाकरे किती अगतिक झाले होते, ते पूर्ण महाराष्ट्राने पाहिले. स्वतःचे २० आमदार असताना अवघे १० आमदार असलेल्या शरद पवारांच्या उमेदवारीवर त्यांना शिक्कामोर्तब करावे लागले. ही सारी चाणक्याची जादू.

देवाभाऊच्या नेतृत्वगुणांवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झालं. देवाभाऊ हे प्रचंड रसायन आहे. हा नेता स्वाभिमानी तर आहेच; पण अपमान सहन करण्याचीही त्याच्यात ताकद आहे. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे तो राखेतून भरारी घेतो. एकनाथ शिंदे यांच्या हाताखाली उपमुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर अनेकांना वाटले की आता देवाभाऊ संपले. पण असे चढउतार आपल्याला विचलित करीत नाहीत, हे देवाभाऊंनी दाखवून दिले. त्यांनी उद्धव ठाकरेंचा पक्ष फोडला, शरद पवारांच्या पक्षाचे तुकडे केले. देवाभाऊ आपल्या अपमानाचा बदला कशा प्रकारे घेतात ते महाराष्ट्राने पाहिले. शरद पवारांसारख्या तेल लावलेल्या पैलवानालाही चितपट केले. अजितदादा नसल्यामुळे अर्थमंत्री पदाची जबाबदारी फडणवीस यांच्यावर आली. महाराष्ट्रासारख्या राज्याचे बजेट सादर करणे गंमत नाही. हरफनमौला देवाभाऊंनी ती लीलया सांभाळली. समतोल बजेट देताना विरोधकांच्या टीकेला चोख उत्तरही दिले. एका एकाला पट्टीत घेतले आणि हिशोबच केला. ठाकरे सेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी राज्यावरील वाढत्या कर्जाचा मुद्दा मांडला होता. त्यांच्या आरोपांच्या फडणवीसांनी चिंधड्या उडवल्या. त्यांच्यावरील कर्जापेक्षा महाराष्ट्रावरील कर्ज कमी आहे, असे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्र राज्यावर फक्त १८ टक्के कर्ज आहे आणि ते मर्यादित आहे. इतर राज्ये कशी कर्जबाजारी आहेत याची आकडेवारीच फडणवीसांनी सादर केली. राज्याच्या तब्येतीची ज्याला जाणीव आहे असा डॉक्टर महाराष्ट्राला मिळाला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने चिंता करायचे काम नाही. महाराष्ट्र योग्य माणसाच्या हातात आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### पाहिजे मनाला शांती!



अशांत मनाला शांत करण्याचे उपाय, समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांमध्ये आहेत, दासबोधाचे अभ्यासक, लेखक व व्याख्याते सुनील चिंचोलकर यांनी अभ्यासकांसाठी मोठमोठे ग्रंथ व साहित्य लिहिले आहेत. परमेश्वराने मानवाला विवेकबुद्धी दिली आहे. आपल्या सुखाचे कारण अथवा दुःखाचे कारण आपल्यालाच माहीत असते. पण क्षणिक मोहासाठी मनुष्य जे दुःखाचे आहे तेच निवडतो. समर्थ म्हणतात, 'ज्या कारणे दुःख जाले! तेचि पुन्हा मनी धरिले !! तेणे गुणे प्राप्त झाले! पुन्हा दुःख !!' माणसाला सुख हवे असते, पण सुख देणाऱ्या गोष्टी नको असतात. माणसाला दुःख नको असते, पण दुःख देणाऱ्या गोष्टी हव्या असतात. आरोग्य हवे असते, पण व्यायाम करावासा वाटत नाही. आजार नको असतो, पण व्यसने करावीशी वाटतात. मनःशांती हवी असते, पण जप, ध्यान यांचा कंटाळा येतो. आवड आणि काय घ्यावं, हे न समजणे म्हणजे दुःखाला कारण होण्यासारखे आहे. माणसाला काय आवडते यापेक्षा काय आवडावे, याला जास्त महत्त्व आहे. जे हिताचे आणि सुखाचे आहे तेच आपल्याला आवडले पाहिजे. सुख देणाऱ्या गोष्टींबद्दल मनात आत्मीयता पाहिजे. मनालाच चांगल्या गोष्टीत रमायची सवय झाली की, कल्पनाही चांगल्याच सुचतात. जे सुख प्रत्यक्ष मिळाले नाही ते आपण कल्पनेने मिळविण्याचा प्रयत्न करतो. म्हणून आपले विचार आपल्याला भगवंतापासून दूर तर नेत नाहीत ना, याची सतत जाणीव असावी.

**मधुकर व्यवहारे**/पुणे/ ९४२३१ ३१०४८

## वाचक पत्रे

### ग्रामीण प्रश्नांना वाचा फोडावी

पुणे जिल्हा केवळ शहरापुरता मर्यादित नाही. ग्रामीण भागात शेती, पाणी, रोजगार आणि आरोग्याचे प्रश्न आहेत. आपल्या पुणे आवृत्तीने ग्रामीण भागातील समस्या आणि यशोगाथा यांना समान स्थान द्यावे. शेतकऱ्यांच्या अडचणी, कृषी तंत्रज्ञान आणि बाजारपेठेतील बदल यावर सखोल लेख असावेत. ग्रामीण-शहरी दुवा मजबूत करण्याचे काम माध्यमांनी करावे, ही अपेक्षा.

**अपेक्षा साने**/पुणे

### सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची व्यवस्था व्हावी

सर्व नगरपालिका आणि महानगरपालिका यांनी विशिष्ट अंतरावर स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी. सोबतच जी स्वच्छतागृहे मोडकळीस आली आहेत त्यांची दुरुस्ती करून वापरण्याजोगे करावेत. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिलांची गैरसोय होणार नाही. स्वच्छतागृहांची व्यवस्था करून त्याची स्वच्छता राखली जावी, ही अपेक्षा.

**देवीदास पाठक**/पुणे

### कीर्तिस्तंभाचे पावित्र्य राखा

रंगभवनजवळील आचार्य शांतिसागर महाराज चौकातील कीर्तिस्तंभ परिसर हा काही पिकनिक पॉईंट नव्हे. या ठिकाणी वाढदिवस साजरे होतात, संध्याकाळच्या वेळेला बाहेरून खाद्यपदार्थ आणून परिसर अस्वच्छ करतात. लाखो रुपये खर्च करून हा कीर्तिस्तंभ महानगर पालिकेने उभा केला आहे. परिसर स्वच्छता ही काही एकट्या महापालिकेची जबाबदारी नाही. नागरिकांनीही पुढाकार घ्यायला हवा. या कीर्तिस्तंभाजवळ बसून ध्यान करता येईल. शांतपणे बसून सकारात्मक दृष्टिकोन विकसित करता येईल. सोलापूरकरांना विनंती की, त्यांनी कीर्तिस्तंभाचे पावित्र्य राखण्यास महानगर पालिकेला सहकार्य करावे.

**अरुण बा. धुमाळ**/सोलापूर/९८९०९०२९२३

### आपण संवेदना गमावली काय?

८ मार्चला नागपूरला दोन वेगवेगळ्या घटल्या. नागपूरचा सुपुत्र फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर हा २८ वर्षाचा पायलट हुतात्मा झाला. सुखोई या अतिशय वेगवान लढाऊ विमानाचे तो प्रशिक्षण घेत होता. पूर्वेशने ऑपरेशन सिंदूरमध्ये भाग घेतला होता. आपण सुरक्षित राहावे म्हणून तो लढत होता. काल त्याचे पार्थिव घरी आणल्यावर त्याच्या घरी जो टाहो फुटला त्याचा आवाज आपल्यापर्यंत पोहोचला नव्हता तरी जाणवत होता. अशा या हुतात्म्याच्या आईवडिलांना भेटायला धीर द्यायला नितीन गडकरी सोडून अन्य राजकारणी लोकांना वेळ नव्हता. दुसरी घटना भारताच्या विजयाची. तो विजय साजरा करताना मश्गूल प्रेक्षकांनी भरपूर फटाके उडवून आनंद साजरा केला. आनंद व्यक्त करताना लोकांनी याचा विचार करायला हवा होता की, एका सुपुत्राने भारतमातेच्या चरणी आपला जीव दिला; याउलट क्रिकेटर फक्त पैशाकरिता खेळले. त्याच वेळी पूर्वेशचे आईवडील आपल्या लेकाचे शव घरी घेऊन गेले. विजय साजरा करावा, पण भान ठेवून! तसेच एका निरपराध स्त्रीचा अपघात झाला; तिला दवाखान्यात नेण्याऐवजी प्रेक्षक व्हिडीओ काढण्यात गर्क होते. अशा घटनांनी मन विषण्ण होते. यावरून लोकांची संवेदना संपली की काय असे वाटते.

**राजेंद्र वाडी**/नागपूर/९४२३६३२२३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाच दिवसांपासून ठिबक सिंचनच्या पाईपचे उत्पादन बंद

## आखाती देशातील युद्धाचे परिणाम आता थेट उद्योगावर; पुरवठ्याची साखळी विस्कळीत

तभा वृत्तसेवा

**बीड** | आखाती देशात सुरु असलेल्या युद्धाचे परिणाम आता थेट उद्योगावर देखील पाहायला मिळत आहे. बीडमध्ये ठिबक सिंचनचे पाईप बनवणाऱ्या कंपनीचे उत्पादन मागील पाच दिवसापासून बंद पडले आहे. क्रूड ऑइलच्या रिफायनरी बंद पडल्याने ठिबक सिंचन पाईप बनवण्यासाठी कच्चा माल मिळत नसल्यानं व्यवसायांना फटका बसत आहे. पुरवठ्याची साखळी देखील विस्कळीत झाली आहे. वाहनांसाठी डिझेल मिळेत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

रिफायनरी मध्येच क्रूड ऑइल येत नसल्याने तेथील उत्पादन बंद

ठिबक सिंचन पाईप बनवण्यासाठी जो कच्चामाल लागायचा तो कच्चामाल क्रूड ऑइलच्या रिफायनरी मधून मिळतो. परंतु आता रिफायनरी मध्येच क्रूड ऑइल येत नसल्याने तेथील उत्पादन बंद आहे. त्याचा परिणाम या उद्योगावर देखील झाला आहे. यापूर्वी कधीही न उद्भवलेली ही परिस्थिती असून कच्चामाल जवळपास दुप्पट किमतीत खरेदी करण्याची वेळ उद्योजकांवर आली आहे. परंतु त्यानंतर ठिबक सिंचनचे पाईप देखील महागणार असल्याने ते शेतकऱ्यांना परवडणारे नसेल अशा स्थितीत आता युद्ध थांबल्यासच हे उत्पादन पूर्व पदावरील येईल अशी माहिती उद्योजक संतोष उपरे यांनी



दिली आहे.

इराण इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात युद्धाचा तणाव

इराण इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. या आखाती देशांमधील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचे गंभीर सावट आता महाराष्ट्रातील बाजारपेठांवर दिसू लागले आहे. इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाला आहे. याचा थेट परिणाम मुंबईतील ऐतिहासिक क्रॉफर्ड मार्केट आणि नाशिकमधील द्राक्ष निर्यातीवर बसला आहे. मुंबईचे मुख्य व्यापारी केंद्र असलेल्या क्रॉफर्ड मार्केटमध्ये आयात होणाऱ्या सुकामेव्याची आवक कमालीची घटली आहे. युद्धामुळे अरबी समुद्रातील मालवाहतूक आणि विमान सेवा विस्कळीत झाल्याने प्रामुख्याने इराण आणि आसपासच्या देशांतून येणारा माल रोखला गेला आहे. इराणी पिस्ता, खजूर, बेदाणे आणि पाईन नट्स यांसारख्या पदार्थांचा पुरवठा खालावला आहे.

नाशिकची द्राक्ष निर्यात ५० टक्क्यांनी घटली

नाशिक जिल्ह्यालाही या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. नाशिकचे जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी नाशिकमधून १ लाख ३१ हजार मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली होती. मात्र, आखाती देशांतील अस्थिरतेमुळे यंदा हे प्रमाण निम्म्यावर म्हणजेच ६५ ते ७० हजार मेट्रिक टनांवर आले आहे. युरोप आणि आखाती देशांकडे जाणारी द्राक्षे बंदरांवर अडकून पडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान होत आहे. द्राक्षांशिवाय कांदा, डाळिंब आणि इतर पालेभाज्यांची निर्यातही मंदावली आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त अंबाजोगाई येथे हिंदू संमेलनाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त येथील सावता माळीनगर, हनुमान मळा, दुर्गा कॉलनी, कुलस्वामिनी कॉलनी, ज्योती नगर, श्रीकृष्ण कॉलनी, या भागातील सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू संमेलनाचे आयोजन शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता करण्यात आले असून यासाठी समाजातील हिंदू संमेलन समिती स्थापन करण्यात आली आहे

या हिंदू संमेलनाच्या अध्यक्षपदी ह.भ.प. श्री अमोल महाराज घोडके यांची तर समिती सदस्य म्हणून प्रा. विनय राजगुरू, डॉ. बालासाहेब मुंडे, डॉ. देविदास खोडेवाड, सतीश वांगे, सतीश बलुतकर,श्रीकांत काळे, राजेंद्र शेप, सुरेखा काळे, ज्योती शिंदे, लक्ष्मी घुगे, अनुजा गुडे, अरुण पत्की, डॉ रोहिणी अंकुश, डॉ. मनीषा रोकडे, अनिल राठोड आदींची निवड करण्यात आली




आहे. हे हिंदू संमेलन सावता माळी नगरातील स्वयंवर मंगल कार्यालय या ठिकाणी आयोजित केले आहे. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ठीक ४:०० वाजता हिंदू संमेलनाची बालगोपालांच्या दिंडीने सुरुवात होईल. तरी सर्व हिंदू जनजागृतीसाठी सदर स्वामी समर्थ वस्तीतील व उपरोक्त उल्लेख केलेल्या वसाहतीमधील सर्व महिला, स्वयंसेवक, कार्यकर्ते, बंधू-भगिनी यांनी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या हिंदू संमेलनांचे आयोजन शहरातील इतर वस्तीच्या माध्यमातून देखील करण्यात येणार आहे.

## श्रीमती पुष्पा जाधव यांना पीएच. डी. प्रदान

तभा वृत्तसेवा

**बीड** | येथील बलभीम महाविद्यालयातील मराठी विभागाच्या संशोधन केंद्रात पीएच .डी. पदवीसाठी अभ्यास करणाऱ्या श्रीमती पुष्पा भीमराव जाधव यांना नुकतीच डॉ. बा . आं . मराठवाडा विद्यापीठाने पीएच .डी . ही पदवी बहाल केली आहे . त्यांनी " कवी निरंजन रघुनाथ आणि समकालीन कवींच्या काव्याचा चिकित्सक अभ्यास " या विषयावर संशोधन केले होते . त्यांना पदवी व पदव्युत्तर



मराठी विभागाचे तत्कालीन प्रमुख डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . संतोष उंदरे, डॉ. मनोहर सिरसाट (मराठी विभाग प्रमुख), सर्व मराठी विभागातील सहकारी, डॉ. महारूद्र जगताप, व इतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## वंशाला दिवा पाहिजे, तीन मुली झाल्या म्हणून सासरच्याचं सुनेसोबत भयानक कृत्य

### नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाला परवानगीसाठी जबरदस्ती, चिमुकल्या मुलींवरचं आईचं छत्र हरपलं

तभा वृत्तसेवा

**बीड** | बीडमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. वंश वाढीसाठी मुलगाच हवा, या मागासलेल्या मानसिकतेतून एका २६ वर्षीय विवाहितेचा बळी गेल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यात समोर आली आहे. तीन मुली झाल्याच्या कारणावरून सासरच्यांकडून होणाऱ्या सततच्या छळाला कंटाळून भक्ती अमोल कोरडे (रा. म्हाळसापूर, ता. बीड) या विवाहितेने कीटकनाशक प्राशन केले होते. महिनाभर मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर ६ मार्च रोजी खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत भक्ती कोरडे हिचा विवाह म्हाळसापूर येथील अमोल कोरडे याच्याशी झाला होता. लग्नानंतर त्यांना तीन मुली झाल्या. मात्र, मुलगा होत नसल्याच्या कारणावरून मागील अडीच वर्षांपासून भक्तीचा छळ सुरू झाला होता. «तुला फक्त मुलीच होतात, घराण्याला वारस हवा आहे,» असे म्हणत पती अमोल, सासरा अर्जुन साधू कोरडे आणि सासू आशाबाई अर्जुन कोरडे हे तिला वारंवार शारीरिक आणि मानसिक त्रास देत होते.

सासरच्या मंडळींचा छळ इतक्यावरच थांबला नाही. पती अमोल याला दुसरे लग्न करायचे असल्याने भक्तीने त्याला संमती द्यावी, यासाठी तिच्यावर दबाव टाकला जात होता. «तू दुसऱ्या लग्नाला परवानगी दे आणि तसे बाँड पेपरवर लिहून दे,» अशी सक्ती करत तिला वारंवार मारहाण केली जात असे. या सततच्या त्रासामुळे आणि अपमानामुळे भक्ती प्रचंड मानसिक तणावाखाली होती.

सासरच्या छळाला कंटाळून भक्तीने २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आपल्या राहत्या घरी कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. तिची प्रकृती खालावल्याने तिला तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती अधिक गंभीर झाल्याने तिला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. महिनाभर उपचार सुरू असतानाही प्रकृतीत सुधारणा झाली नाही आणि ६ मार्च रोजी तिने अखेरचा श्वास घेतला.

भक्तीच्या मृत्यूनंतर तिची आई गंगूबाई प्रभू ठोकळ यांनी पिंपळनेर पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी पती अमोल कोरडे, सासरा अर्जुन कोरडे आणि सासू आशाबाई कोरडे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अर्जुन घोलवाल करत आहेत. मुलगा-मुलगी समान मानण्याच्या काळातही केवळ मुली झाल्या म्हणून एका महिलेला जीव गमवावा लागल्याने बीड जिल्ह्यात संताप व्यक्त केला जात आहे.

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना रोटरी क्लब ऑफ बीडचा चंपावतीरत्न पुरस्कार

तभा वृत्तसेवा

**बीड** दि.१३(प्रतिनिधी): | रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणारा मानाचा चंपावतीरत्न पुरस्कार यंदा राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना देण्यात येणार आहे. दि.२२ मार्च रोजी हॉटेल निलकमल मध्ये ग्लोबल विकास ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी मयंक गांधी आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे गव्हर्नर रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. याप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट लर्निंग फ़ेसीलेटर रो ओम मोतीपवळे रोटरी माजी गव्हर्नर रो हरीश मोटवाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. बीड शहराच्या शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणार्या जनमान्य व्यक्तींना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. यापूर्वी हा पुरस्कार अभिनेते मकरंद अनासपुरे, स्व.केशरबाई क्षीरसागर, वे.शा.स.धुंडीराज महाराज पाटांगणकर, श्रीहरी तुंगार, रामप्रसाद राठी, स्व. मोतीराम वरपे, डॉ.श्रीहरी लहाने, सुभाषचंद्र सारडा, शिवाजीराव पंडित, स्व.नामदेव क्षीरसागर आदी मान्यवरांना देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्यास शहरातील सर्वच सामाजिक आणि सेवाभावी संस्थेतील सदस्यांनी तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रोजेक्ट चेअरमन सी.ए.सुरेश लड्डा, रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर, सचिव सुमित जैस्वाल यांनी केले आहे.

## पेशवा प्रतिष्ठानतर्फे महिला दिनानिमित्त महिला बँक कर्मचाऱ्यांचा सन्मान



तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | महिला दिनानिमित्त पेशवा प्रतिष्ठानतर्फे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दीनदयाल नागरी सहकारी बँकेतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान संचालिका सौ. शरयू हेबाळकर आणि उद्योजिका सौ. अलका देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्त्री म्हणजे देवीचे रूप असून कोणत्याही क्षेत्रात सर्वोकृष्ट योगदान देण्याची ताकद महिलांमध्ये असल्याचे प्रतिपादन शरयू हेबाळकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. अनिता औटी यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर सौ. कल्याणी कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमात बँकेतील,गोस्वामी प्रतिभा अनंतराव ,टाक सुप्रिया पांडुरंग .डाके सुजाता बाळासाहेब ,कंगळे समीक्षा मनोज ,पांडे अल्का संतोष,कुलकर्णी करुणा कल्याणराव ,शिंदे रुपाली अंकुशराव,राठोड छाया पंडीतराव ,पोटलावार कविता कृष्णा या महिला कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा कुलकर्णी यांनी केले. तर सौ. प्रणिता पोखरीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या प्रतीक्षा जोशी, राजश्री पिंपळे,ज्योत्स्ना लाटकर, स्मिता भातलवंडे , रेणुका भालेराव,राजश्री देशमुख, मनिषा उपळाईकर, उमा देशमुख, ऋतुजा कोंडपल्ले, रोहिणी मुडेगावकर, सई पिंपळकर यांनी पुढाकार घेतला...

## स्त्री म्हणजे देवीचे रूप - शरयू हेबाळकर

### पेशवा प्रतिष्ठानतर्फे महिला दिनानिमित्त महिला बँक कर्मचाऱ्यांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | महिला दिनानिमित्त पेशवा प्रतिष्ठानतर्फे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दीनदयाल नागरी सहकारी बँकेतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान संचालिका सौ. शरयू हेबाळकर आणि उद्योजिका सौ. अलका देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्त्री म्हणजे देवीचे रूप असून कोणत्याही क्षेत्रात सर्वोकृष्ट योगदान देण्याची ताकद महिलांमध्ये असल्याचे प्रतिपादन शरयू हेबाळकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. अनिता



औटी यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर सौ. कल्याणी कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमात बँकेतील,गोस्वामी प्रतिभा अनंतराव ,टाक सुप्रिया पांडुरंग .डाके सुजाता बाळासाहेब ,कंगळे समीक्षा मनोज ,पांडे अल्का संतोष,कुलकर्णी करुणा कल्याणराव ,शिंदे रुपाली अंकुशराव,राठोड छाया पंडीतराव ,पोटलावार कविता कृष्णा या महिला कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा कुलकर्णी यांनी केले. तर सौ. प्रणिता पोखरीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या , राजश्री पिंपळे,ज्योत्स्ना लाटकर, स्मिता भातलवंडे , रेणुका भालेराव,राजश्री देशमुख, मनिषा उपळाईकर, उमा देशमुख, ऋतुजा कोंडपल्ले, रोहिणी मुडेगावकर, सई पिंपळकर यांनी पुढाकार घेतला.

## महामार्गावर वाहनांची कोंडी ;बाह्य बाजू रस्त्याची गरज



तभा वृत्तसेवा

**केज (प्रतिनिधी)** | केज शहराच्या मध्यवर्ती भागातून खामगाव पंढरपूर व अहमदपूर अहिल्यानगर हे महामार्ग जातात. इतरत्र बाजारपेठ नसल्यामुळे

शासकीय रुग्णालय, भवानी चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिक्षक कॉलनी या भागात

**लोकप्रतिनिधींचा पुढाकार हवा - खा.रजनीताई पाटील, खा बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा, नगराध्यक्ष सीताताई बन्सोड,रमेश आडसकर यांनी पुढाकार घेऊन नेहमी वाहतुकीची कोंडी होत असलेला प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.**

मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत गर्दी झालेली असते. वाहनांची कोंडी होते. गर्दीमुळे यापूर्वी अनेक वेळा शहरात अपघात झाले आहेत.यामुळे यापूर्वी अनेकांना जीव गमावा लागला आहे. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी बाह्य बाजू रस्त्याची आवश्यकता आहे. बाह्य रस्ता तयार झाल्यास वाहनांची कोंडी होणार नाही. रहदारीचा प्रश्न सुटेल.अपघातात जाणारे जीव वाचतील. तात्काळ बायपास तयार करावा अशी मागणी केली जात आहे. या दोन्ही मुख्य महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढत आहे. हे दोन्ही मार्ग शहरात नेहमीच गर्दीने वाहनांची कोंडी झालेले असतात. पादचाऱ्यांना वाहनाने धडकून अनेक वेळा अपघात झाले आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अधिकचा वेळही लागतो आणि जीवित हानी होत आहे. बाह्य वळण रस्ता तयार झाल्यास कमी वेळेत अधिकचा प्रवास करणे प्रवाशांना शक्य होईल. नेहमी रस्ते जाम होण्याची समस्या सुटणे शक्य होईल. व्यवसायिकांची मागणी - शहरातील शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी यांना या गर्दीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. केज तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे. ग्रामीण भागातून शेतकरी कामगार नोकरदार व्यावसायिक यांची शहरात नेहमीच गर्दी असते. पंचायत समिती, तहसील कार्यालय, शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन,न्यायालय अशी प्रशासकीय कार्यालये असल्याने त्या कामाने निमित्त येणाऱ्या वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनाही त्रास सहन करावा लागतो. व्यवसायिकांना तासनतास ताटकळत व्यवसाय बंद ठेवावे लागतात. मुख्य महामार्गावरची वाहतूक बाह्य मार्गाने वळवावी अशी मागणी केली जात आहे.

## 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली फसवणूक करणारा गजाआड

तभा वृत्तसेवा

**बीड** | मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली राज्यातील महिलांची फसवणूक करणाऱ्या एका भामट्याला बीडच्या अंमळनेर पोलिसांनी जालन्यातून अटक केली आहे. आरोपी महिलांना फोन करून आपण समाज कल्याण विभागाचे अधिकारी असल्याचे सांगायचा आणि योजनेअंतर्गत शिलाई मशीन, पिठाची गिरणी असे साहित्य मोफत मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक करायचा. या कारवाईमुळे योजनेच्या नावाखाली



लूट करणाऱ्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

या प्रकरणातील फिर्यादी कविता विठ्ठल पवार (वय ४० वर्षे, रा. पिंपळवंडी, ता. पाटोदा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अंमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी गोरखनाथ नवनाथ पन्हाळकर (वय ३५ वर्षे, रा. नाळवंडी, हल्ली मुक्काम तळेगाव, बीड) हा महिलांना फोन करून 'भांड्याचे कीट' आणि इतर वस्तू मोफत देण्याचे सांगत असे. मात्र, या वस्तूंच्या ट्रान्सपोर्टचा खर्च म्हणून प्रत्येकी २२५० रुपये क्यूआर कोडवर मागवून घेऊन त्यांची फसवणूक करत होता.

या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना अनेक तांत्रिक अडचणी आल्या. आरोपी वारंवार आपले सिम कार्ड बदलत होता आणि मोबाईल फोन चालू-बंद करत होता. मात्र, स्थानिक गुन्हे शाखा आणि अंमळनेर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण विभागाच्या मदतीने आरोपीचे अचूक लोकेशन शोधून काढले. ९ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी जालन्यातून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. आज आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याची रवानगी जिल्हा कारागृह, बीड येथे करण्यात आली आहे.

## नवीन ट्रान्सफॉर्मर तसेच दहा नवीन पोलसह विद्युत लाईनची उभारणी

तभा वृत्तसेवा

**बीड** | परळी शहरातील भीमनगर, गमामा मस्जिद परिसर तसेच बरकतनगरच्या काही भागात दीर्घकाळापासून कमी-जास्त व्होल्टेजमुळे फ्रीज, टीव्ही यांसारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळण्याच्या घटना वारंवार घडत होत्या. या समस्येमुळे नागरिक अनेक वर्षे त्रस्त होते. मात्र आता या भागातील लाईट व्होल्टेजची समस्या कायमची दूर व्हावी यासाठी राज्याचे माजी मंत्री व आपल्या भागाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या आदेशानुसार



आणि नगरसेवक अनंतराव इंगळे व अल्ताफभाई पठाण यांच्या पुढाकारातून २०० MVA चा नवीन ट्रान्सफॉर्मर तसेच दहा नवीन पोलसह विद्युत लाईनची उभारणी करण्यात आली आहे. या नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन श्रीफळ वाढवून करण्यासाठी उपस्थित राहिलो.

यावेळी नगरसेवक महादेव रोडे, महेंद्रजी रोडे,उपअभियंता राठोड ,कांतीलाल मुंडे,वायरमन उत्तमराव फड,नागेश व्हावळे, नगर परिषद विद्युत विभागाचे प्रमुख घुगे, शिवराम बापू होळंबे तसेच परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मनाला खूप समाधान मिळाले.

## के.एस.पी. विद्यालय येथे पालक मेळावा व स्नेह भोजन कार्यक्रम उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | दि.१२/०३/२०२६ रोजी के.एस.पी. विद्यालय, कालिका नगर, बीड येथे दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी पालक मेळावा व स्नेह भोजनाचा साजरा करण्यात आला. शैक्षणिक वर्षाच्या अखेरस पालकांना आपल्या लाडक्या पाल्या विषयीची प्रगती व सुधारणा या विषयी चर्चा करण्यास यावी या हेतुने हा पालक मेळावा साजरा करण्यात आला. जेव्हा शिक्षक आणि पालक एकत्र येतात, तेव्हा विद्यार्थ्याच्या घराकडे





आणि शाळेतील अशा दोन्ही बाजूंचा विचार होतो. यामुळे मुलांच्या मानसिक आणि शैक्षणिक विकासाला योग्य दिशा मिळते. मेळाव्यामुळे पालकांचा शाळेवर आणि शिक्षकांवर विश्वास वाढतो. शाळा ही केवळ अभ्यासाची जागा नसून ती मुलांच्या भविष्यासाठी काम करणारी संस्था आहे, ही भावना दृढ होते. पालकांना मुलांच्या अभ्यासाची पद्धत समजल्यामुळे, ते घरीदेखील मुलांकडून योग्य प्रकारे अभ्यास करून घेऊ शकतात. यामुळे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा होते. अनेकदा पालकांना आपल्या पाल्यासाठी कोणत्या करिअरच्या संधी उपलब्ध आहेत किंवा त्याने काय करावे, हे समजत नाही. अशा वेळी शिक्षकांचे मार्गदर्शन त्यांना मोलाचे ठरते. केवळ मार्क न सांगता विद्यार्थ्याचे वर्तन, छंद आणि सुधारणेच्या संधींवर चर्चा करण्यात आली. तसेच पालकांमधील सौ. देवकते मॅडम, सौ. दहिफळे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर सर्वांनी मिळून भोजनाचा अस्वाद घेतला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख श्री. ऋषिकेशजी शेळके, एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शेळके, मार्गदर्शक सौ.अंजलीताई शेळके, पालक प्रतिनिधी जगन्नाथ लांडगे, अंजली तिडके, अनिता जावळे, सौ. देवकते, सौ. दहिफळे शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उसतोडीच्या पैशाच्या वादातून तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

तालुक्यातील उळुप येथील रणजीत सर्जे राव सानप (वय ४२) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भूम पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रणजीत सानप यांनी ११ मार्च रोजी सायंकाळी ते १२ मार्च रोजी दुपारपूर्वी रामेश्वर व बह्मणपूर शिवारातील चौघुले यांच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी तानाजी पंडित सानप (वय १९, रा. उळुप ता. भूम जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून औदुंबर उर्फ पिनू विष्णू दराडे (रा. रामेश्वर ता. भूम जि. धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




उसतोडीच्या उचल पैशांवरून झालेल्या वादातून आरोपीने रणजीत सानप यांना मारहाण करून त्रास दिल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### जवाहर विद्यालयात ‘गणित जत्रा’ संपन्न

**अणदूर, दि.१३ मार्च -**

जवाहर विद्यालय, अणदूर येथे भारताचे उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तथा शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त ‘गणित जत्रेचे’ आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलुरे व मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या गणित जत्रेत पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांनी ५५ गणितीय प्रयोग व ३० रांगोळी कलाकृतींचे सादरीकरण केले. सचिव रामचंद्र आलुरे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी व श्रीशैल वाले यांनी विविध स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रयोगांची माहिती घेतली. या गणित जत्रेसाठी परीक्षक म्हणून किरण गायकवाड, रोहित मोरे, शिवरत्न शिंदे, शितल गीते व सारिका नरसुडे यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पल्लवी मैत्री, पूजा कुळमेथे, प्रतिभा ऐकुंडे, रोहित मोरे, जयहिंद पवार व ठाकरू राठोड यांनी परिश्रम घेतले.



### बाभळगाव येथे महिला दिन साजरा

**इटकळ, दि.१३ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथे पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था, अणदूर यांच्या वतीने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबई चव्हाण होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रेणुका लिंबुळे, नागेश चव्हाण व तुळसाबाई उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष बाबई चव्हाण यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांचे हक्क व अधिकार तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. महिलांनी शिक्षण, स्वावलंबन व संघटित होऊन प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रम ास परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

### नळदुर्ग पत्रकार भवनासाठी ठराव मंजूर

**नळदुर्ग, दि.१३ मार्च -**

नळदुर्ग शहरात पत्रकार भवन उभारण्यासाठी जागा देण्याचा ठराव नगरपालिकेच्या दि. १२ मार्च रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यामुळे शहरात पत्रकार भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शहरात पत्रकार भवनासाठी जागा मिळावी यासाठी नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून नगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येत होता. नगरसेवक तानाजी जाधव व सुधीर पोतदार यांच्या पाठपुराव्यामुळे हा विषय सभेच्या अजेंड्यावर ठेवण्यात आला. सभेत चर्चा झाल्यानंतर सर्व नगरसेवकांनी एकमताने पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली. या ठरावाबद्दल संघाच्या वतीने नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार, दत्तात्रय दासकर, मारुती खारवे यांच्यासह सर्व नगरसेवकांचे आभार मानण्यात आले.



### ‘सन्मान स्त्रीशक्तीचा’, २० महिलांचा गौरव

**इटकळ, दि.१३ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त लोकमंगल मल्टीस्टेटच्या ईटकळ शाखेच्या वतीने ‘सन्मान स्त्रीशक्तीचा’ या उपक्रमांतर्गत प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ईटकळ व परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० महिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अंकिता सुंके जळकोटे होत्या. तर जयश्री धोंडूशा कोळी व प्रियंका कबीर मिटकरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमास रीजनल अधिकारी सुरवसे रतन, रोखपाल अभिषेक बिराजदार, गुंडय्या स्वामी, सोमेश्वर स्वामी तसेच महिला उपस्थित होत्या.



### परंडा येथे महिला मेळावा उत्साहात

**परंडा, दि.१३ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त परंडा येथे स्वयंम शिक्षण प्रयोग व एलआयसी एचएफएल प्रकल्पांतर्गत एमटेक सभागृहात महिला मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकात्मिक महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश कुकडे होते, तर कृषी विस्तार अधिकारी सुरज बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी महिलांच्या सक्षम ीकरणावर मार्गदर्शन केले. तसेच सेंद्रिय शेती व विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. या प्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

# झेडपीत कमळ फुलले : महायुतीची एकजूट



## अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील तर उपाध्यक्षपदी उषाताई गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवत सत्ता आपल्या ताब्यात घेतली. जिल्ह्याला उत्सुकता लागून राहिलेल्या अत्यंत चुरशीच्या लढतीनंतर अखेर धाराशिव जिल्हा परिषदेत तब्बल ६४ वर्षानंतर प्रथमच कमळ फुलेले.

महायुतीने सत्ता काबीज करत इतिहास रचला आहे. भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांची जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड झाली आहे. तर शिवसेनेचे माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांच्या पत्नी उषाताई गायकवाड यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निकालानंतर जिल्हा परिषद परिसरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत व फटाके फोडत जल्लोष साजरा केला. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी आज (दि.१३) विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते १२ या वेळेत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली.

महायुतीच्या वतीने भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत उमेदवारी अर्ज दाखल केले. अध्यक्ष पदासाठी तेर जिल्हा परिषद गटाच्या सदस्या अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांनी तर उपाध्यक्ष पदासाठी कदेर गटातील शिवसेनेच्या उषाताई गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. दुसरीकडे महाविकास आघाडीनेही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. अध्यक्ष पदासाठी शिराढोण गटातील कांचनमाला संगवे यांनी तर



उपाध्यक्ष पदासाठी कवठा गटातील काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत रंगली.

दुपारी २ वाजता विशेष सभेला सुरुवात झाली. त्यानंतर उमेदवारांची घोषणा करून मतदान प्रक्रिया पार पडली. अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत महायुतीच्या अर्चनाताई पाटील यांना ४५ मते मिळाली, तर महाविकास आघाडीच्या कांचनमाला संगवे यांना ९ मते मिळाली. एक सदस्य गैरहजर होता. त्यामुळे अर्चनाताई पाटील यांचा विजय निश्चित झाला. उपाध्यक्ष पदासाठीही महायुतीच्या उषाताई गायकवाड यांना ४५ मते मिळाली, तर महाविकास आघाडीचे महेश देशमुख यांना १० मते मिळाली. त्यामुळे उषाताई गायकवाड यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. निकाल जाहीर होताच जिल्हा परिषद परिसरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. गुलाल उधळत, फटाके फोडत आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी विजय साजरा केला.



धाराशिवच्या राजकारणात ही निवड ऐतिहासिक मानली जात असून जिल्हा परिषदेत प्रथमच महायुतीची सत्ता प्रस्थापित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क होते. दिवसभर जिल्हा परिषद परिसरात राजकीय हालचाली आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख राजन साळवी, मा.आ. सुजितसिंह ठाकूर, मा.खा. रविंद्र गायकवाड, मा.आ. राहुल मोटे, मा.आ. ज्ञानराज चौगुले तसेच भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विजय निश्चित होता; : आ. राणाजगजितसिंह पाटील

धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चितच होता. जिल्हा परिषदेत आमच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याने हा निकाल अपेक्षितच होता, अशी प्रतिक्रिया आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. ते म्हणाले, महायुतीच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासकामांना गती देण्याचे काम केले जाईल.जिल्हा परिषदेत स्थिर नेतृत्व मिळाल्यामुळे आता जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल. सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करत धाराशिव जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.



### भाजपा कार्यकर्त्यांचा विजय : सुजीतसिंह ठाकूर

जिल्हा परिषदेत प्रथमच कमळ फुलल्याने हा जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांचा विजय असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार सुजीतसिंह ठाकूर यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, आजपर्यंत आम्ही निष्ठावंत भाजपा कार्यकर्ते म्हणून पक्षासाठी काम केले. पक्ष वाढवण्यासाठी अपार मेहनत घेतली आणि जिल्ह्यात भाजपा तळागाळापर्यंत पोहोचवली. प्रथमच जिल्हा परिषदेवर कमळ फुलले असून भगवा फडकला आहे, याचा मोठा अभिमान वाटतो. भाजपाचा अध्यक्ष प्रथमच विराजमान झाला असून हा क्षण आमच्यासाठी अत्यंत आनंदाचा आहे, असेही त्यांनी सांगितले.



### आनंदोत्सवाचा क्षण : दत्ताभाऊ कुलकर्णी

जिल्हा परिषदेत प्रथमच भाजपाचा अध्यक्ष विराजमान झाल्याने हा आनंदोत्सवाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली. ते म्हणाले, अनेक वर्षे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचे आज फळ मिळाले आहे. जिल्हा परिषदेत प्रथमच कमळ फुलले असून भाजपाचा अध्यक्ष निवडून आल्याने सर्व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महायुतीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती दिली जाईल, आणि विजय महायुतीच्या एकजुटीमुळे मिळाला, असेही त्यांनी सांगितले.



## दरोड्याच्या तयारीत असलेले पाच जण जेरबंद; शस्त्रांसह १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

वाशी पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक करत त्यांच्या ताब्यातील शस्त्रसामुग्री व दोन मोटारसायकलींसह सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शेंडी शिवारात कमळेश्वर पारधी पिडीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बबन रंगनाथ शिंदे, लहु आबा शिंदे, तानाजी अशोक काळे, सोनू बबन शिंदे व सुभाष शिवाजी शिंदे (सर्व रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव) हे दि. ११ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० ते दि. १२ मार्च रोजी १२.१० वाजण्याच्या सुमारास शेंडी शिवारातील कमळेश्वर पारधी पिडीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ दरोडा टाकण्याच्या उद्देशाने एकत्र जमले होते.

त्यावेळी त्यांच्या ताब्यात स्प्लेंडर (क्र. एमएच २५ बीडी १३१०) व मोटारसायकल (क्र. एमएच २५ एआर ६३२०) यांसह चार लोखंडी कोयते, एक तलवार तसेच कॅरीबॅगमध्ये तिखट पावडर असा एकूण सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. याबाबत वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अमृत २.० योजनेतील पाणीपुरवठा कामाची नगराध्यक्षांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ मार्च -**

अमृत २.० योजनेअंतर्गत नळदुर्ग शहरात सुरू असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामाची दि.१२ मार्च रोजी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार व पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव यांनी पाहणी केली.



आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून शहरात सुमारे ४६ कोटी रुपयांच्या खर्चाची नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १ मधील वसंतनगर व दुर्गानगर परिसरात ‘फेज-१’ लवकर सुरू करून नागरिकांना दररोज पाणीपुरवठा करण्याचे नगरपालिकेचे नियोजन आहे.

यावेळी नगराध्यक्षांसह उपनगराध्यक्ष, पाणीपुरवठा समितीचे सभापती, नगरसेवक निरंजन राठोड, नगरसेविका छमाबाई राठोड व माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर यांनी वसंतनगर येथे उभारण्यात आलेल्या नवीन पाण्याच्या टाकीची पाहणी करून सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला.

ही योजना पूर्ण झाल्यानंतर नळदुर्ग शहरातील नागरिकांना दररोज पाणीपुरवठा करण्यास मदत होणार असून सध्या भेडसावत असलेल्या पाण्याच्या समस्येतून दिलासा मिळणार असल्याचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले.

## ‘शालार्थ’वरील आर्थिक माहिती सार्वजनिक करण्यास विरोध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

शालार्थ प्रणालीवर कार्यरत खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक व आर्थिक माहिती सार्वजनिक करण्याच्या शिक्षण संचालनालयाच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र विरोध दर्शवला आहे. हा निर्णय शिक्षकांच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकारावर गदा आणणारा असल्याने त्याचा तात्काळ फेरविचार करावा, अशी मागणी परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षण संचालकांना पत्राद्वारे केली आहे.



४ मार्च २०२६ रोजी शिक्षण संचालक (माध्यमिक) यांनी काढलेल्या पत्रानुसार माहिती अधिकार अधिनियमाचा आधार घेत कर्मचाऱ्यांचे एकूण वेतन, कपात व निव्वळ वेतन यासारखी वैयक्तिक माहिती शालार्थ पोर्टलवर सर्वांसाठी खुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पगार ही अत्यंत वैयक्तिक बाब असून ती सार्वजनिक करणे हे संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत असलेल्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन ठरते, असे परिषदेने नमूद केले आहे. कर्मचाऱ्यांची आर्थिक माहिती उघड झाल्यास सायबर गुन्हेगार, खाजगी सावकार व मार्केटिंग कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले जाण्याची शक्यता असल्याचेही पत्रात म्हटले आहे. तसेच पगार व कपातीची माहिती सार्वजनिक झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तुलना व इर्षा निर्माण होऊन त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो.

त्यामुळे या निर्णयाला तात्काळ स्थगिती देऊन फेरविचार करावा, अशी मागणी उमाकांत कुलकर्णी यांनी केली आहे.

## तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ मार्च -**

येथे आरोग्य जनजागृतीचा संदेश देण्यासाठी तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ मार्च रोजी रोटरी क्लब आणि विठाई हॉस्पिटल तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप मिळावे यासाठी विविध संस्था, संघटना आणि नागरिकांनी सहकार्य करावे तसेच सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

समाजातील प्रत्येक घटकाने निरोगी आयुष्याच्या दिशेने एक पाऊल उचलावे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

तुळजापूर शहर व परिसरातील नागरिकांनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असेही आयोजकांनी सांगितले आहे.

## वाहतूक नियमभंगावर कारवाई; १.१५ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व जिल्ह्यातील संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने १२ मार्च रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर विशेष कारवाई करण्यात आली.




या मोहिमेत एकूण १३१ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण १ लाख १५ हजार रुपये ‘तडजोड शुल्क’ वसूल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## खिल्लार गाईला जर्सी वासरु; पशुवैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ मार्च -**

परंडा तालुक्यातील लोणी येथे खिल्लार जातीच्या गाईला जर्सी जातीचे वासरू झाल्याची घटना समोर आली असून याबाबत संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. चुकीचे कृत्रिम रेतन केल्यामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप शेतकरी महावीर वसुदेव शिंदे यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, परंडा तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, लोणी येथील तत्कालीन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सरपणे यांच्या विरोधात महावीर वसुदेव शिंदे (मु.पो. लोणी, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी तक्रार दिली आहे. शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांच्या कडे खिल्लार जातीची गाय असून दि.३० मे २०२५ रोजी त्यांनी लोणी येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्या गाईचे कृत्रिम रेतन करून घेतले होते. रेतन करताना त्यांनी स्पष्टपणे खिल्लार जातीचे वीर्य वापरण्याची मागणी केली होती. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी पैसेही घेतल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे.

दरम्यान, दि.६ मार्च रोजी संबंधित गाय व्याली असता तिला जर्सी जातीचे वासरू जन्माला आले. खिल्लार गाईला जर्सी जातीचे वासरू होणे हे चुकीचे वीर्य वापरल्याचे किंवा तांत्रिक हलगर्जीपणाचे द्योतक असल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. या घटनेमुळे आपले आर्थिक नुकसान झाले असून जातिवंत खिल्लार प्रजातीच्या संवर्धनालाही धक्का बसल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी महावीर शिंदे यांनी केली आहे.

सदर घटनेमुळे पशुपालकांमध्येही चर्चा



सुरू झाली असून प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांना योजनांचा लाभ वेळेत द्या : अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मार्च-**

स्वच्छतेच्या माध्यमातून समाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळणे गरजेचे आहे. शासन निर्णयानुसार सफाई कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या प्रगतीसाठी विविध योजनांचे लाभ नियमानुसार व वेळेत देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात सफाई कामगारांच्या अडचणी व प्रश्नांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी



किरण अंबेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी, विभागप्रमुख तसेच सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत चर्चा करण्यात आली. हदगाव नगर परिषदेअंतर्गत प्रलंबित प्रकरणावर येत्या आठ दिवसांत कार्यवाही करून अहवाल सादर करा. तसेच समितीनुसार असलेली सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना अध्यक्ष डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष शिबिरे आयोजित करून आयुष्मान भारत कार्ड व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत घरकुल, समाजकल्याण विभागाच्या योजनांद्वारे पाल्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, तसेच महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत उद्योगासाठी कर्ज वेळेत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

याशिवाय सफाई कर्मचाऱ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नती, साप्ताहिक सुटी, नियमित वेतन तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांना प्रलंबित लाभ तातडीने देण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

माध्यमांशी बोलताना अध्यक्ष डागोर यांनी सांगितले की, भविष्यात सफाई कर्मचारी कंत्राटी न राहता नियमित कर्मचारी करण्यावर भर देणार असल्याचे त्यानी सांगितले.

निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रशासन सफाई कर्मचाऱ्यांच्या हितासाठी समन्वयाने कार्य करून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावेल, अशी ग्वाही दिली. प्रारंभी नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड यांनी सादरीकरणाद्वारे विविध बाबींची माहिती दिली.

## उमरी (बां.) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १३ मार्च-**




आदिवासी बहुल किनवट तालुक्यातील नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मौजे उमरी (बां.) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. या संदर्भातील प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय नांदेड यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे.

किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव रामजी केराम यांनी १४ फेब्रुवारी २०२६ रोजी शासनाकडे पत्र पाठवून उमरी (बां.) येथे नव्याने ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्याची मागणी केली होती. आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळावी तसेच गंभीर रुग्णांना उपचारासाठी नांदेड किंवा इतर शहरात जावे लागू नये, या उद्देशाने त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

किनवट तालुका हा नांदेड जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र असून जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १५० किलोमीटर अंतरावर आहे. या भागाची भौगोलिक व्याप्ती मोठी असून अनेक दुर्गम गावांमधील रुग्णांना उपचारासाठी लांब अंतर कापावे लागते. त्यामुळे उमरी (बां.) येथे ग्रामीण रुग्णालयाची मागणी अनेक वर्षांपासून होत होती.

दरम्यान, उमरी (बां.) परिसरातील ११ गावांच्या सरपंचांनी ग्रामपंचायत ठरावाद्वारे नव्याने ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याची मागणी केली आहे. या ठरावांच्या प्रती प्रस्तावासोबत जोडून तीन प्रतींमध्ये संबंधित प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे. शासनाकडून मंजुरी मिळाल्यास किनवट तालुक्यातील हजारो आदिवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दरम्यान किनवट तालुक्यातील आदिवासी नागरिकांना दर्जेदार व जवळच्या ठिकाणी आरोग्य सेवा मिळावी, यासाठी उमरी (बां.) येथे ग्रामीण रुग्णालयाची मागणी शासनाकडे केली आहे. या प्रस्तावाला लवकरच मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केली.

## महिला बचत गटांना स्नॅक्स उत्पादन प्रशिक्षण

**किनवट** -मौजे गणेशपूर (ता. किनवट, जि. नांदेड) येथे नाबार्ड, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि गृहलक्ष्मी महिला ग्रामविकास संस्था, किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने महिला गडत्रृ गटांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्नॅक्स उत्पादन प्रशिक्षणाचा समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला नाबार्डचे डीडीएम दिलीप दमयांवार, महाराष्ट्र



ग्रामीण बँक नांदेडचे मुख्य रिजनल मॅनेजर मनोहर वाडकर, पोलीस निरीक्षक गणेश कराड, शाखा अधिकारी राजेश समरीत, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, सरपंच अनुसया तडसे तसेच गृहलक्ष्मी महिला ग्रामविकास संस्थेच्या अध्यक्षा संगीता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना दिलीप दमयावार यांनी ग्रामीण भागातील महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून घरबसल्या उत्पन्नाचे साधन निर्माण करावे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांना लघुउद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळेल. अशा उपक्रमांना नाबार्डचे सहकार्य राहील, असे त्यांनी नमूद केले. मुख्य रिजनल मॅनेजर मनोहर वाडकर यांनी महिलांनी तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे कौतुक करून महिलांनी लघुउद्योग सुरू करण्याचे आवाहन केले. उचएत्रृझ योजनेच्या माध्यमातून बँकेकडून कर्ज देण्यासाठी आम्ही तयार आहोत, असे त्यांनी सांगितले. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी महिलांना मार्गदर्शन करताना, मेहनतीने तयार केलेल्या वस्तू कोणी घरातील किंवा बाहेरील व्यक्ती दारू पिऊन हिसकावून घेत असेल किंवा त्रास देत असेल तर पोलीस प्रशासन तुमच्या पाठीशी राहील, असे आश्वासन दिले. प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे यांनी गृहलक्ष्मी महिला ग्रामविकास संस्था किनवटच्या कार्याचे कौतुक करताना, संस्थेच्या माध्यमातून आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांना विविध प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगितले. यानंतर बँक मॅनेजर राजेश समरीत यांच्या हस्ते महिला गडत्रृगटांना कर्ज वाटप करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून श्री गणेश स्नॅक्स उत्पादन कंपनी ची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला प्रशिक्षणार्थी महिला तसेच परिसरातील अनेक होतकरू महिला उपस्थित होत्या.

## गोदावरी संस्थेच्या वतीने तळेगाव येथील जामा मस्जिदमध्ये इफ्तार पार्टी

**उमरी** -तालुक्यातील तळेगाव येथे दरवर्षी प्रमाणे मुस्लिम धर्मीयां च्या पवित्र अशा रमजान महिन्याच्या निमित्त गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन १० मार्च रोजी करण्यात आले यां



कार्यक्रम प्रसंगी मुस्लिम समाजाचे वयोवृद्ध नेते चांदपाशा बेग मोगल से स सोसायटीचे व्हाईस चेअरमन तखीर बेग मोगलं. मुफ्ती सोहेल, चेरमन सतीश देशमुख, रामू रेड्डी कप्पावार, गणेश पाटिल, आनंदा रेड्डी, पत्रकार पांडुरंग सोनकांबळे, मैनूल्ला बेग पटेल, मुसा पटेल खायाज पटेल, शेख अलीम साब, जमील पटेल सज्जद पटेल, शेख मुसा अली, रफत बेग माझर बेग, शेख शमशोद्दीन अकबर, बेग खैसर पटेल, अहेमद बेग, सिकंदर पटेल, मुस्ताक बेग, अयुब बेग अजमत बेग, इसक बेग, साईनाथ सावंत, संभाजी पाटिल, राम गुरुणवाड, जब्बार पटेल, शब्बीर पठाण, हुमेर बेग, समीर शेख, समीर बेग, नदीमबेग, शेख अखिल, नसीर बेग, नसीर शेख, मोगल अवेस, मोईन बेग, मुदसीर बेग ,अफरोझ पठाण, नाय्युम बेग, रियाझ बेग, अनवर बेग, इसा पटेल, ड्रा खैसर मुझम्मील पटेल व असख्य मुस्लिम रोझेदार व यां इफ्तार पार्टीस मोठयां संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते .

## जिल्ह्यात १६ व १७ मार्च रोजी यलो अलर्ट जारी

**नांदेड** -प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी १३ मार्च २०२६ रोजी सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १६ व १७ मार्च २०२६ या दोन दिवसांसाठी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केलेला आहे. १६ व १७ मार्च २०२६ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**टि. सी. हरवली**

माझी रवि सुरेश बोकेफोड नावाची बारावी पास टि.सी. मुदखेड ते नांदेड रेल्वे प्रवास करित असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क**
रेल्वे स्टेशन रोड शिवाजी नगर,एस बि आई बँक जवळ
मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड ४३१८०६
मो. न. ९९७५१९१६४

## शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयावर प्रहार संघटनेकडून समाधान व्यक्त

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ मार्च-**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी गेल्या दोन वर्षापासून सातत्यांने सुरु असलेल्या संघर्षाला अखेर यश मिळाले आहे.



प्रहार माजी राज्यमंत्री तथा संस्थापक अध्यक्ष बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या पाश्वभुमीवर राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफी बाबत सकारात्मक निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मोजरी आणि नागपुर,आंदोलनाला अखेर यश आणि बच्चु कडू महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून श्रेय मिळाल्याचे व्यक्त केले.

या निर्णया बद्दल प्रहार दिव्यांग भावी जिल्हाध्यक्ष अनिल पा.शेटे मुदखेडकर यांनी समाधान व्यक्त करत हा विजय प्रहार संघटनेचा व शेतकऱ्यांचा तसेच प्रहारच्या कार्यकत्यांच्या एकजुटीचा असल्याचे म्हटले आहे. प्रहार दिव्यांग ता. महिला अध्यक्ष सौ.केशरताई शंकरराव पा. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार दोन वर्षात राज्यभरात तसेच नांदेड जिल्ह्यात विविध,आंदोलने ,निवेदने,मोर्चे जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातुनं शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

शंकरराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील अनेक कार्यकत्यांनी स्वता:च्या स्वखर्चातुन आंदोलने उभी करुन शेतकऱ्याच्या हक्कासाठी सातत्यांने आवाज उठवला आहे. या सातत्यपुर्ण संघर्षांमुळे सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला आणि अखेरीस मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारला कर्जमाफी बाबत निर्णय द्यावा लागला. अशी प्रतिक्रिया सौ.केशरताई शिंदे पा.यांनी दिली.

कर्जमाफीचा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक असला तरी प्रहार तालुका दिव्यांग पदाधिकारी मुदखेड,व प्रहार जिल्हा पदाधिकारी नांदेड यांनी बच्चु भाऊ कडू यांचे आभार व्यक्त केले.

## बनचिंचोली जि. प. शाळेचे प्रकरण थेट विधानसभा अध्यक्षांच्या दालनात

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १३ मार्च-**

तालुक्यातील बनचिंचोली येथील शाळेच्या जागेबाबतचा विषय अत्यंत गंभीर असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दि.१२ मार्च रोजी दुपारी २.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे विधानसभा अध्यक्षांच्या दालनात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस महाराष्ट्र राज्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर , ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची व आ.बाबुराव कदम कोहळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत राज्यातील जिल्हा परिषदांच्या मालकीच्या शाळांच्या जागा, त्यावरील न्यायालयीन प्रकरणे तसेच शाळांच्या इमारतींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः हदगाव येथील प्रकरणासह महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या मालकीच्या सर्व शाळांच्या जागांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून पॅनेलवरील वकील कार्यरत आहेत त्या प्रकरणांमध्ये कामात कसूर झाल्यास



संबंधित वकिलांवर कारवाई करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच ज्या ठिकाणी शाळेच्या जागेबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत, त्या ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध करून देत शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

या विषयात कोणत्याही प्रकारची हलगर्जी आढळल्यास संबंधित दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश बैठकीत देण्यात आले. विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून पुढील कार्यवाहीसाठी मार्ग निश्चित करण्यात आला.

या बैठकीस अपर मुख्य सचिव एकनाथ डवले, प्रधान सचिव (ग्रामविकास) रणजित सिंह देवल, प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) संजय पचगले, शिक्षण उपआयुक्त लातूर, आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड, शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड, वै.शि. डिगे (उपसचिव, शालेय शिक्षण विभाग), विजय भोसले (अवर सचिव), संदीप माळोदे (अति मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड), वंदना फुटाणे (शिक्षण अधिकारी, जि.प. नांदेड), गटविकास अधिकारी, हदगाव तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## चुडावा येथे महाराजस्व समाधान शिबिर

**तभा वृतसेवा**
**चुडावा, दि. १३ मार्च-**

महसूल विभागाअंतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता शेतकरी विद्यार्थी महिला याचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे जनतेच्या तक्रारी त्वरित निकाली काढणे या साठी चुडावा येथील मंडळ स्तरावर दि.१४ मार्च रोज शनिवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच पर्यंत जिल्हा परिषद प्रशाला येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर आयोजित करण्यात आले आहे यावेळी विभागीय आयुक्त संभाजीनगर डॉ .जितेंद्र पापळकर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण अपर जिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी उपविभागीय अधिकारी गंगाखेड जीवराज डापकर जिल्हा पुनर्वसन अधिकारी डॉ.प्रतिभा गोरे पूर्णा तहसीलदार माधवराव बोथीकर अधिकारी उपस्थित राहणार आहेत या शिबिरामध्ये १५ वर महसुली सेवा मिळणार आहे.

## ग्रामीण रुग्णालयात जागतिक किडनी दिवस उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. १३ मार्च-**

धर्माबाद ग्रामीण रुग्णालय येथे काही महिन्यांपासून डायलिसिस सेंटर सुरू झाले आहे सरकारी रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू झाल्यामुळे अनेक गरिब रुग्णांना सवलतीच झाले आहे. दरवर्षी मार्च महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी रुग्णालयात 'जागतिक किडनी दिन' साजरा केला जातो. दि.१२ मार्च रोजी जागतिक किडनी दिवस निमित्त धर्माबाद येथील रुग्णालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. मोनिका पावडे यांनी किडनीचे आरोग्य जपण्यासाठी योग्य आहार, नियमित तपासणी आणि पाणी पिण्याचे महत्त्व याबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व केक कट करून करण्यात आली. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी सांगितले की, आज काल बदललेल्या जीवनशैलीमुळे किडनी संबंधित आजार वाढताना दिसत आहेत. त्यामुळे वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे, रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

या प्रसंगी रुग्णालयात आलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आली तसेच किडनीचे आरोग्य कसे जपावे याबाबत माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाल पंडित साहेब , डॉ. मोनिका पावडे,वैद्यकीय अधिकारी अनुजा तुमोड इंन्चार्ज सिस्टर शुभांगी सुर्यवंशी, सिनीयर तंत्रज्ञ संघशिल कांबळे, ज्युनिअर तंत्रज्ञ सम्यक कांबळे अधिपरीचारीका निकिता नागलवाडे ,सफाई कर्मचारी उत्तम वाघमारे, डॉ. ज्ञानेश्वर शिरगिरे,अधीपरिचारीका, छाया कुलकर्णी,मनिषा महामुनी, सह रुग्णालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांगांनी ३१ मार्च पूर्वी युडी-आयडी कार्डसह कागदपत्रे सादर करावीत : तहसीलदार अभिजीत जगताप

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १३ मार्च-**

तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे दिव्यांग व्यक्तींसाठी जारी केले जाणारे युडीआयडी (युनिक डिसॅबिलिटी आयडेंटिटी कार्ड) अर्थात 'युनिक' किंवा एकमेव अधिकृत ओळखपत्र 'स्वावलंबन कार्ड' जे देशभरातील सर्व सरकारी योजना, सवलती आणि दिव्यांगांशी संबंधित प्रमाणपत्रांसाठी एकच वैध दस्तऐवज म्हणून काम करणारे आपले युडी- आयडी कार्ड व आधार कार्ड ३१ मार्च २०२६ पर्यंत तहसील कार्यालयात सादर करावेत, अन्यथा शासनाकडून मिळाणारा योजना सवलतीचा लाभ बंद होणार असल्याने दिव्यांग लाभार्थ्यांनी सर्व कागदपत्रे सादर करावीत ,असे आवाहन तहसीलदार अभीजीत जगताप यांनी केले आहे.

विशेष सहाय्य विभागाअंतर्गत विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक दिव्यांग व्यक्तीचे युनिक डीसाबिलिटी आयडेंटी कार्ड तयार असणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने, ज्या उर्वरीत लाभार्थ्यांकडे यु डी आय डी कार्ड उपलब्ध आहे. परंतू आत्तापर्यंन्त कार्यालयात सादर केले नाही तसेच ज्या लाभार्थ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची मुदत संमलेली आहे, अशा लाभार्थ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्राचे



नुतणीकरण करुन त्यांनी आपल्या यु डी आय डी कार्ड आधार कार्ड ची प्रत दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत माहूर तहसील कार्यालयात संगांयो विभागाकडे सादर करावी.तसेच ज्या लाभार्थ्यांनी अद्याप यु डी आय डी कार्ड काढलेले नाही त्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करून किंवा संबंधित शासकीय रुग्णालय अधिकृत वैद्यकीय मंडळाकडून यु डी आयडी कार्ड प्राप्त करून त्याची प्रत तहसील कार्यालयात जमा करावी.

दिव्यांगांसाठी युडीआयडी कार्ड हे एक अत्यंत महत्त्वाचे केंद्रशासकीय ओळखपत्र असून, याद्वारे सर्व सरकारी योजनांचा लाभ एकाच कार्डावर मिळतो.वारंवार दिव्यांग प्रमाणपत्राच्या कागदपत्रांची पूर्तता करण्याची गरज उरत नाही.

तेव्हा निर्धारित मुदतीत यु डी आय डी कार्ड सादर न केल्यास शासनाच्या नियमानुसार संबंधित लाभार्थ्यांचा योजनेचा लाभ कायम स्थगित करण्यात येऊ शकतो. संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांनी याची नोंद घेऊन दि. ३१ मार्च २०२६ पूर्वी यु डी आय डी कार्डची प्रत तहसील कार्यालयात सादर करावी, ज्यांच्याकडे यु डी आय डी कार्ड नाही त्यांचे अनुदान बंद करण्यात येईल, असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यानी केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांनी मुख्याधिकारी नीलम कांबळे भारावल्या

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १३ मार्च-**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधन वृत्ती आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने विश्व पब्लिक स्कूल, देगलूर येथे आयोजित करण्यात आलेले विज्ञान व पर्यावरण संवर्धन प्रदर्शन अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी विज्ञान, संशोधन आणि पर्यावरण विषयक विविध प्रकल्प सादर करत आपल्या कल्पकतेचे आणि ज्ञानाचे प्रभावी दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण नवकल्पनांनी देगलूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीलम कांबळे भारावून गेले. या सादरीकरणामुळे उपस्थित




मान्यवरही प्रभावित झाले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन देगलूर नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सौ. नीलम कांबळे, सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शोभा भूमे आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ एच. एस. खंडागळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध वैज्ञानिक मॉडेल्स, पर्यावरण संवर्धनाशी संबंधित प्रकल्प आणि संशोधनात्मक मांडणी पाहून मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना मुख्याधिकारी नीलम कांबळे यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या अभिनव शैक्षणिक उपक्रमांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, विषयांचे सखोल ज्ञान, प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण आणि वैविध्यपूर्ण विषयांची निवड यामुळे त्या भारावून गेल्याचे त्यांनी नमूद केले. विश्व पब्लिक स्कूल ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी आणि मानवी मूल्यांची जोपासना करणारी उत्कृष्ट शैक्षणिक संस्था आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी सय्यद फैज, तब्बसूम फैज, पत्रकार मिलिंद वाघमारे, संतोष मनधरणे, पालक प्रतिनिधी डॉ. गंगाधर जूकरे, विशाल बरगे, महेश पल्लेवाड, विना कुलकर्णी, कोयलावार, कल्पना कदम तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी विश्व पब्लिक स्कूलच्या संचालिका सौ. आम्रपाली कैलास येसगे तसेच शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले.

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड.
Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439

## थोडक्यात...

### एस २६ सिरीज आणि गॅलेक्सी बड्स४ सिरीज उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर** : सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कं. लि.ने आज गॅलेक्सी एस२६ सिरीज आणि गॅलेक्सी बड्स४ सिरीजच्या जागतिक उपलब्धतेची घोषणा केली. सॅमसंगचे थर्ड जनरेशन एआय फोन्स गॅलेक्सी एस२६ अल्ट्रा, गॅलेक्सी एस२६+ व गॅलेक्सी ड२६ सर्वोत्तम व सक्रिय गॅलेक्सी एआय अनुभव देतात, ज्यामुळे वापरकर्ते काही पाय-यांसह अधिक टास्क्स करू शकतात. गॅलेक्सी अनपॅक्डनंतर नवीन लाँच करण्यात आलेल्या गॅलेक्सी एस२६ सिरीजला लवकर अपवादात्मक मागणी मिळाली आहे, जेथे सुरूवातीच्या प्री-ऑर्डर आकडेवारींनी मागील रेकॉर्ड्सना पार केले आहे आणि दोन-अंकी वाढीची नोंद केली आहे. प्रीमियम गॅलेक्सी एस२६ अल्ट्रा त्वरित इतरांपेक्षा वरचढ मॉडेल ठरले आहे, जेथे जगभरातील ७० टक्क्यांहून अधिक ग्राहकांनी प्री-ऑर्डर केली आहे.

### कॅनकिड्स आणि सलाम बॉम्बे येथील विशेष फॅन गटाचे स्वागत

**छत्रपती संभाजीनगर** : मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने वॉर्ड्स २०२६मध्ये 'ये पल है फॅन्स का' या संकल्पनेचा विस्तार करत कॅनकिड्स आणि सलाम बॉम्बे या संस्थांतील मुलांना विशेष अनुभव देण्यात आला. मुंबईतील एनएससीआय डोम येथे झालेल्या सोहळ्यात या मुलांना आयकॉनिक 'पर्पल कार्पेट'वर चालण्याची आणि कार्यक्रम जवळून पाहण्याची संधी मिळाली. संगीत दिग्दर्शक मिथून आणि गायिका पलक मुच्छाल यांच्यासोबतही त्यांनी संस्मरणीय क्षण अनुभवले. कॅनकिड्सच्या २१ आणि सलाम बॉम्बेच्या १५ मुलांनी या उपक्रमाचा आनंद घेतला. या उपक्रमातून झीने मनोरंजनासोबत सामाजिक बांधिलकीही अधोरेखित केली. १५ मार्च रोजी हा सोहळा झी सिनेमा, झी टीव्ही आणि झी५वर प्रसारित होणार आहे.

### पोको इंडियाकडून पोको सी ८५ एक्स ५ जी लाँच

**छत्रपती संभाजीनगर** : पोको इंडियाने आज पोको सी८५एक्स ५जीच्या लाँचची घोषणा केली. हा स्मार्टफोन दैनंदिन वापरकर्त्यांकरिता विश्र्वसनीय कार्यक्षमता, मोठा सर्वोत्तम डिस्प्ले आणि दीर्घकाळापर्यंत टिकणारी बॅटरी देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. विद्यार्थी, पहिल्यांदाच स्मार्टफोन खरेदी करणारे आणि विश्र्वसनीय दैनंदिन कार्यक्षमतेचा शोध घेत असलेले वापरकर्ते यांच्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या पोको सी८५एक्स ५जीमध्ये कार्यक्षम हार्डवेअरसह व्यावहारिक वैशिष्ट्ये आणि दीर्घकालीन सॉफ्टवेअर सपोर्ट आहे.

### इलेक्ट्रिशियन आणि डीलर्ससाठी कार्यक्रम आयोजित केला

**पुणे :** प्रादेशिक ऊर्जा नेटवर्क मजबूत करण्यासाठी प्युअरपॉवर च्या वितरक नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांनी हॉटेल थाटीपल्ली, कोठागुडेम येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. हा दोन सत्रांचा कार्यक्रम खम्मम आणि भद्राद्री कोठागुडेम येथील स्थानिक तांत्रिक आणि व्यावसायिक समुदायाला जोडण्यासाठी आयोजित करण्यात आला. अलीकडेच नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांना प्रादेशिक वितरक भागीदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक इलेक्ट्रिशियनसाठी तांत्रिक सेमिनारने झाली. हे इलेक्ट्रिशियन या भागातील ऊर्जा इंस्टॉलेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या सत्रात प्युअरपॉवर ची प्रगत तंत्रज्ञान आणि एआयएस १५६ टप्पा २ सुरक्षा नियम महत्त्व समजावून सांगितले गेले. सहभागीना स्मार्ट-ग्रिड तंत्रज्ञान आणि सोलर-फर्स्ट प्रणालीबद्दल माहिती देण्यात आली, जेणेकरून ते स्थानिक घरांमध्ये चांगली सेवा देऊ शकतील.

### अन्विता भावंडांचे पालकत्व जिंकू शकेल का?

सोनी सब वरील इत्ती सी खुशी ही मालिका अन्विता (सुम्बुल तौकीर खान) हिच्या प्रवासाची कहाणी सांगते, जिथे ती आपल्या लहान भावंडांसाठी आयुष्याच्या कठीण प्रसंगांना सामोरी जाते. आता मालिकेत भावंडांच्या कस्टडीचा प्रश्न्न पुढे सरकत असताना, ही लढाई अधिक तीव्र होत चालली आहे. अन्विताला आपल्या भावंडांना सुरक्षित आणि स्थिर आयुष्य देण्याची क्षमता सिद्ध करायची आहे.

सगळ्यांना धक्का देणारा निकाल

सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका एका प्रेरणादायी स्त्रीची कहाणी सांगते. पुष्पा (करुणा पांडे) ही स्वतःच्या बळावर उभी राहिलेली, आयुष्याच्या कठीण प्रसंगांना तोंड देणारी महिला आहे. गृहिणीपासून वकील होण्यापर्यंतचा प्रवास करताना तिने अनेक संकटांचा सामना केला, पण न्यायासाठी लढताना आपल्या मूल्यांशी तडजोड केली नाही.

### टेकनो ची 'समर फेस्ट' ऑफर

**मुंबई** : भारतामध्ये उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना टेकनो आपल्या ग्राहकांसाठी खास समर फेस्ट घेऊन आले आहे. २ मार्च ते २२ मार्च २०२६ दरम्यान चालणाऱ्या या उपक्रमामुळे स्मार्टफोन खरेदी अधिक उत्साहवर्धक आणि फायदेशीर ठरणार आहे.या ऑफरदरम्यान ग्राहकांनीपोवा कर्व २, पोवा स्लिम किंवा स्पार्कगो ३ हे स्मार्टफोन खरेदी केल्यास त्यांना मोठ्या लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. ग्राहकांना फक्त टेकनो च्या टचपॉइंट्सवर किंवा सोशल मीडियावर उपलब्ध असलेला क्यूआर कोड स्कॅन करून टेकनो च्याव्हॉट्सॲप चॅनेलद्वारे नोंदणी करावी लागेल.

### वाई सिरीजमध्ये वीवो वाई ५१ प्रो ५जी लॉन्च

**मुंबई** : वीवो इंडियाने आपल्या वाई सिरीजमध्ये नवीन स्मार्टफोन वीवो वाई५१ प्रो ५जी लॉन्च केला आहे.यामध्ये वीवोची अशी कल्पना दिसून येते की, प्रोडक्टिव्हिटी आणि एंटरटेनमेंट दोन्हींसाठी उपयोगी ठरणारे प्रॅक्टिकल इनोव्हेशन वापरकर्त्यांना देणे.वीवो वाई ५१ प्रो ५जी मध्ये ७२०० एमएएच ची मोठी बॅटरी देण्यात आली असून हा स्मार्टफोन मीडियाटेक डायमेन्सिटी ७३६० टर्बो चिपसेटवर चालतो.

# संघर्षातून यशाचा मार्ग शोधता येतो- प्राचार्य डॉ.सत्यप्रेम घुमरे



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १३ मार्च :** येथील पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन,व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा च्या समारोप प्रसंगी बोल-ताना डॉ.घुमरे यांनी म्हटले की संघर्षातून यशाचा मार्ग शोधता येतो त्यासाठी विद्यार्थ्यांनो तुमच्यामध्ये संघर्ष करण्याची क्षमता असली पाहिजे,विद्यार्थ्यांनी कामांमध्ये नाविन्यता जोपासली पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनो तुमचा आदर्श चुकला तर तुमचा प्रवास चुकतो,त्यासाठी तुम्ही तुमचा आदर्श हा योग्य व प्रेरणादायी असला पाहिजे,त्यासाठी तुम्ही सातत्याने कार्य केले पाहिजे,मी स्वतःएक यशस्वी उद्योजक म्हणून आज उभा आहे,माझा प्रवास कंपनीतील सामान्य कामगार ते उद्योजक असा रोमहर्षक प्रवास आहे,व्यवसाय तुमचे पहिले प्रेम असले तर तुम्हाला झोप येत नाही,यातून संघर्ष करण्याची व त्यातून नवमार्ग शोधण्याची प्रेरणा तुम्हाला मिळते त्यासाठी तुम्ही नवीन उद्योग उभा करण्यासाठी सजग असले पाहिजे.शिक्षणातून तुम्हाला उद्योग व्यवसाय करण्याचे प्रेरणा मिळाली पाहिजे त्यासाठी तुम्ही मोठे आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपली वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन विद्याधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सत्यप्रेम घुमरे यांनीकेले.पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयातील आजीवन जीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे वतीने आयोजित कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते,कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित नलावडे हे होते या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षा बरोबरच तुम्ही नवन-वीन कौशल्य आत्मसात केली पाहिजेत व्यवसाय यशस्वी करण्यासाठी तुम्हाला सरावाची गरज असते तसेच आर-ोग्य सांभाळण्यासाठी तुम्हाला नियमित व्यायामाची,नियमाचीआणि चांगल्या सवयीची गरज असते असे प्रतिपादन त्यांनी केले,तिसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना प्रा डॉ.हनुमंत वानकर यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व रोजगाराच्या संधी बाबत विद्यार्थ्यांना संबोधित केले माहिती तंत्रज्ञानाच्या युगात समुपन मार्गदर्शनाचा दुष्काळ आहे.शिक्षणे केवळ नोकरीसाठी नसून व्यावसाय करण्याचा उत्तम मार्ग आहे.विद्यार्थ्यांनी कामांमध्ये सातत्य जोपासले पाहिजे,स्वतःचे आत्म परीक्षण करून स्वतःच्या क्षमता शोधून आपला व्यवसाय शोधला पाहिजे,स्पर्धा परीक्षेमध्ये नियोजन व सातत्य आवश्यक आहे,यशस्वी विद्यार्थी सातत्यपूर्ण अभ्यास करत असतो,तेव्हा तुम्ही स्पर्धा परीक्षा बरोबरच वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी,नवीन कौशल्य आत्मसात केली पाहिजेत असे प्रतिपादन प्रोफेसर हनुमंत वानकर यांनी केले .

चौथ्या सत्रात प्रा.डॉ प्रकाश वाणी यांनी व्यक्तिमत्व विकासावर मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी नैतिकता चारित्र्य जपले पाहिजे आपले व्यक्तिमत्व आकर्षक ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपल्यातील वेगळेपणाची जपवणूक केली पाहिजे,जगातील ज्ञान कसे स्वीकारायचे ते कसे आत्मसात करायचे हे आपल्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते,नेहमी परिस्थितीशी जुळून घेणारे जीवनात यशस्वी होतात.मानव हा सामाजिक प्राणी आहे तो स्वतःला संघर्षशील म्हणून अंतर्गत व बाह्य स्वरूपामध्ये व्यक्त झाला पाहिजे,विद्यार्थ्याने आदर्श जीवन जगण्यासाठी निसर्गासोबत चालले पाहिजे,तसेच युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे असे प्रतिपादन प्रोफेसर प्रकाश वाणी यांनी केले,कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे समन्वयक डॉ.भास्कर टेकाळे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.विक्रम भुतेकर यांनी आणि आभार डॉ.किशोर लोखंडे,यांनी मानले,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.दिगंबर गंगावणे,डॉ. श्रीकांत जाधव,डॉ. प्रशांत देशमुख,डॉ. एल.सी.कुरपटवार,डॉ.संतोष तांदळे,प्रा. ज्योती भा ना गाडेकर,अधाने,प्रा.भिसे सर,डॉ.कांबळेसर, राजू तुपे,प्रा.डॉ.सुराशे सर,राजू मोरे,भरत औरंगे,आदी ने मेहनत घेतली.कार्यक्रमास विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रविवारी एमजीएम येथे 'गांधी टॉक्स' चित्रपटाचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १३ मार्च :** मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (-खत्रऋ) राऊंड द इयर कार्यक्रमांतर्गत रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात 'गांधी टॉक्स' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. किशोर बेळेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

'गांधी टॉक्स'हा चित्रपट वेगळ्या शैलीत मांडलेला समकालीन प्रयोगशील चित्रपट आहे. हा एक सायलेंट (संवादविरहित) चित्रपट असून संपूर्ण कथानक दृश्यभाषा, अभिनय, देहबोली आणि संगीताच्या माध्यमातून उलगडत जाते. चित्रपटाला प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी संगीत दिले आहे. या चित्रपटात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभिनेते विजय सेतुपती, अरविंद स्वामी, अदिती राव हैदरी आणि मराठीतील लोकप्रिय अभिनेते सिद्धार्थ जाधव यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. याशिवाय महेश मांजरेकर, उषा नाडकर्णी, गोविंद नामदेव आणि प्रियदर्शिनी इंदलकर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

चित्रपटाची कथा मुंबईतील वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील व्यक्तींच्या आयुष्याभोवती फिरते. एका बेरोजगार तरुणाच्या संघर्षाचे आणि एका श्रीमंत व्यावसायिकाच्या आयुष्यातील उलथापाल-थीतीचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.

या चित्रपटात महात्मा गांधींच्या विचारांचा आधुनिक काळाशी अस-लेला संबंध आणि त्याची उपयुक्तता यावर संवेदनशील पद्धतीने भाष्य केले आहे. समाजातील बदलते मूल्य, नैतिकता आणि मानवी वर्तन यावर सूक्ष्म निरीक्षण करणारा हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो.

प्रवेश विनामुल्य असून चित्रपट क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी, अभ्यासक आणि रसिक प्रेक्षकांनी या प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आ-वाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## व्यावसायिक गॅस पुरवठा ठप्प; घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. १३ मार्च :** तालुक्यात सध्या व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा काही प्रमाणात ठप्प झाल्याने हॉटेल व इतर व्यावसायिक आस्थापनांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, घरगुती वापरासाठी लागणाऱ्या गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीतपणे सुरू असून तूर्तास तरी तालुक्यात घर-गुती गॅसची कोणतीही टंचाई नसल्याची माहिती समोर आली आहे.

तालुक्यात एकूण ७ गॅस एजन्सी कार्यरत असून नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा नियमित राहावा यासाठी पुरवठा विभाग सक्रिय झाला आहे. पुरवठा निरीक्षण अधिकारी निलेश राठोड तसेच पुरवठा निरीक्षक वैभव तोंडे यांनी गॅस गोदामांना भेट देऊन सिलेंडर साठा व वितरण व्यवस्थेची तपासणी केली.

तालुक्यात गॅस टंचाई निर्माण होऊ नये यासाठी संबंधित गॅस एजन्सींशी सातत्याने संपर्क ठेवून परिस्थितीचा आढावा घेतला जात असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली. सध्या घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्र्वास ठेवू नये व अनावश्यक साठेबाजी टाळावी, असे आवाहन पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

## घृष्णेश्र्वर मंदिर परिसर विकास कामांबाबत सर्व विभागांनी उपाययोजना संयुक्तपणे राबवाव्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १३ मार्च :** कुंभमेळाच्या पार्श्र्वभुमिवर वेरुळ येथील घृष्णेश्र्वर मंदिर परिसरात विविध विकासकामे राबवावयाची आहेत. या सर्व विभागांनी आपल्या विभागामार्फत करावयाच्या विकासकामांसंदर्भात उपाययोजना संयुक्तपणे राबवाव्या,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. वेरुळ येथील घृष्णेश्र्वर मंदिर परिसर विकास आराखड्याच्या अंमलबजावणी संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड,उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, पुरातत्व विभागाचे शिवकुमार भगत, पोलीस निरीक्षक डी. आर. फराटे आदी उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील भूगोल विभागाची कोकण दर्शन शैक्षणिक सहल रवाना




**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १३ मार्च :** अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील भूग-ोल विभागाची शैक्षणिक सहल कोकण दर्शनासाठी उत्साहात रवाना झाली.या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थी महाडचा गणपती,अलिबाग,काशीद बीच,मुरुड-जंजिरा किल्ला,रायगड किल्ला,पाली व उन्हेरे या ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देणार आहेत.

या शैक्षणिक सहलीचा शुभारंभ महाविद्यालयाचे संचालक, शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. निलेश गाडेकर यांच्या हस्ते नारळ फोडून व हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आला.या प्रसंगी विद्यार्थ्यांना सहलीदरम्यान इतिहास, भूगोल व पर्यटनाची प्रत्यक्ष माहिती मिळावी तसेच सहल सुरक्षित व ज्ञानवर्धक ठरावी,अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

## पिक्चर बॉईज १५ मेपासून प्रदर्शित होणार

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १३ मार्च :** चित्रपटात हिरो बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांची धडपड विनोदी पद्धतीने मांडणारा पिक्चर बॉईज हा मराठी चित्रपट १५ मेपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रेक्षकांना हलकाफुलका मनोरंजनाचा अनुभव देण्याचा या चित्रपटाचा उद्देश आहे. त्रिमूर्ती फिल्म्सची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे निर्माते रवी पांडुरंग पंडितपवार व राजा पांडुरंग पंडितपवार, तर सहनिर्माते शिवाजी केशव पाटील आहेत. कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन निलेशसिंग राजपूत यांनी केले आहे. चित्रपटात प्रतीक लाड, हंसराज जगताप, अरबाज शेख आणि घनश्याम दरोडेचा (छोटा पुढारी) यांच्या प्रमुख भूमिका असून नवोदित व अनुभवी कलाकारांची फळी यात दिसणार आहे.

## अनिता म्हस्के याचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड , दि. १३ मार्च :** शहरातील अनिता प्रकाश म्हस्के (वय ५७) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. नगररचना विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी प्रकाश म्हस्के रा. सिल्लोड यांच्या त्या पत्नी होत. पडेगाव येथे त्यांचा अंत्यविधी झाला. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर ची भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १३ मार्च :** ३१ मार्च २०२६ रोजी २६२५ व्या श्री.भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे सकल जैन समाजाच्या माध्यमातुन साजरा करण्यात येणार असुन या महोत्सवाची नविन कार्यकारणीची निवड करण्यासाठी सकल जैन समाजाचे अध्यक्ष श्री.राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या उपस्थितीत सकल जैन समाजाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महासचिव महावीरजी पाटणी,कोषाध्यक्ष जी.एम.बोथरा,खंडेलवाल दिंगबर जैन पंचायतचे अध्यक्ष महावीर पाटणी,वर्धमान स्थानकवासी श्रावक संघाचे सचिव इंदरचंद संचेती, जैन श्श्र्वेतांबर मुर्तीपुजक संघाचे अध्यक्ष अनिलकुमार सचेती, तेरापंथ समाजाचे अध्यक्ष कौशीक सुराणा, अग्रवाल दिंगबर जैन समाजाचे अध्यक्ष मुकेश साहुजी, सैतवाल दिंगबर समाजाचे अध्यक्ष अमोल पुर्णेकर, यांच्या सानिध्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीत जन्मकल्याणक महोत्सव समिती २०२६ ची कार्यकारणी ची निवड करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी अग्रवाल दिंगबर जैन समाजाचे प्रतिक सा-हुजी, श्श्र्वेतांबर मुर्तीपुजक संघाचे कार्याध्यक्ष पदी अजय सिंघवी, महिला कार्याध्यक्ष सारीका साहुजी, महासचिव पदी सैतवाल दिंगबर जैन समाजाचे बाहुबली वायकोस, महिला महासचिव ललीता साकला, कोषाध्यक्ष जैन श्श्र्वेतांबर तेरापंथ सभेचे पंकज साकला, महिला कोषाध्यक्ष मनिषा भंसाली, कार्यकम सयोंजक खंडेलवाल दिंगबर जैन पंचायत चे श्रेणीक कासलीवाल, महिला संयोजीका वैशाली धोंगडे, सचिव श्श्र्वेतांबर जैन स्थानकवासी श्रावक संघाचे हितेश कांकरीया, महिला सचिव अनिता पहाडे तर महिला सहसचिव पदी प्रिया चोरडिया, सहकोषाध्यक्ष पदी सविता लोढा आदींची निवड करण्यात आली. गेल्या वर्षाचे अध्यक्ष स्वप्नील पारख यांनी २०२५ चा लेखा जोखा बैठकीत मांडला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सभेचे प्रास्ताविक महासचिव महावीर पाटणी यांनी केले. तसेच अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांनी सभेते मार्गदर्शन केले. यावेळी सकल जैन समाजाचे उपाध्यक्ष प्रशांत देसरडा,विलास साहुजी,वृषभ कासलीवाल, विनोद बोकडी या, दिंगबर क्षिरसागर, राजेश मुथा, प्रमोद पाटणी,हर्षेल साहुजी, विजय सुगंधी, अमोल सुगंधी, विजयकुमार वायकोस,संतोष पापडीवाल, मधु जैन, मिना पापडीवाल, मंगला पारख, करैणा साहुजी, कविता अजमेरा, तन-ुजा गांधी, निता गादीया, साधना शहा, निखील संगवे, मेघा सुगंधी, भारती संघवी, प्रमोद डेरे, भावना सेठीया, सविता लोढा यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

जा.क्र./जे-३/ १२०३ /२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
दि. 06 MAR 2026

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
चौकशी अर्ज क्रमांक: जे-३/८८०/२०२६- कलम :- १९
न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : Amuzesh Educational Trust, Chhatrapati Sambhajinagar.
अर्जदार :- Manzoor Khan Masood Khan

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) ५०००/-.

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय**
**क.स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १५१/२०२६

अर्जदार १) दामोधर पंढरीनाथ ढोले,२) शकुंतला मनोहर पवार,रा.पवार वस्ती, सावंगी लासुर स्टेशन, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ३) पुष्पाबाई ज्ञानेश्र्वर मोइन,रा. सर्वे नं. ३/५, साई सिलिकॉन व्हॅली पॅन्सी, फ्लॅट नं. ५०३.विंग सी. बालेवाडी, बाणेर, पुणे ४) व्दारकाबाई रघुनाथ काळे, रा.भगुर, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ५) सरस्वतीबाई श्रीधर ढोले,६) आप्पासाहेब श्रीधर ढोले, अर्जदार नं. १. ५ व ६ रा. टेमापुरी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : - निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही. जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत पंढरीनाथ गोविंदा ढोले यांचा दि.२७/०५/२०१४ रोजी मौजे टेंभापुरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन त्यांची पत्नी साळुबाई पंढरीनाथ ढोले पण मयत झालेली आहे. तसेच मयत पंढरीनाथ गोविंदा ढोले यांची आई नामे सावित्रीबाई गोविंदा ढोले आणि वडील नामे गोविंदा ढोले यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत पढरीनाथ गोविंदा ढोले आणि मयत साळुबाई पंढरीनाथ ढोले हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. १ ते ४ आणि मयत श्रीधर पंढरीनाथ ढोले यांचा जन्म झाला आहे.मयत पंढरीनाथ गोविंदा ढोले आणि मयत साळुबाई पंढरीनाथ ढोले यांचे वर नमुद वारसांपैकी मुलगा नामे श्रीधर पंढरीनाथ ढोले यांचा दि.०२/०९/२०१९ रोजी मौजे टेंभापुरी. ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला आहे. मयत श्रीधर पंढरीनाथ ढोले आणि अर्जदार नं. ५ सरस्वतीबाई श्रीधर ढोले हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. ६ आप्पासाहेब श्रीधर ढोले यांचा जन्म झाला आहे. मयत पंढरीनाथ गोविंदा ढोले यांना अर्जदार नं. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत पंढरीनाथ गोविंदा ढोले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आ-क्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल, कुरीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिवक्यानी आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी दिले.

पुढील तारीख २१/०४/२०२६

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर